## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 679/2010

श्री पी. एम. पद्मावार
बी 1/202, शिवराया सोसायटी, समृध्दी संकूल
सिव्हील लाईन अमरावती रोड
नागपूर – 1 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता
सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक – 1, नागपूर
सदर, नागपूर
2) श्री भांडे
जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता
सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक – 1, नागपूर
सदर, नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 2.8.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 19.5.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 31.5.2010 रोजी नोटीस काढून दि. 21.6.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता यांच्या विनंतीनुसार पुढील दिनांक देण्यात आले आहे. त्यानुसार दि. 2.8.2010 रोजी सुनावणी ठेवण्यात आली. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 23.12.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडे 1) Govt. Accomodation Rules ची प्रत. 2) आपले कार्यालयीन दि. 22.7.04 चे पत्र क्र. 6005/काअ/माअकि नुसार आपले कार्यालयाकडे प्रलंबीत असलेली माहिती 3) आपले कार्यालयीन दि. 18.5.05 चे पत्र क्र. 3666 का. 3 (2) माशा नुसार अद्याप अप्राप्त असलेली माहिती अशी मागितलेली दिसून येते. सदरची माहिती युपीसी सर्वसाधारण टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 14.1.2010 रोजी मुद्या क्र. 1 प्रमाणे शासन निर्णयाची प्रत पुरविण्यात येत आहे अर्जातील मुद्या क्र. 2 व 3 मध्ये मोघम स्वरुपात पत्र देवून त्याची प्रलंबित माहिती मागितलेली आहे. त्यावरुन कोणताच बोध

होत नाही त्यामुळे आपणास कार्यालयात येवून दस्तऐवज पाहण्याची परवानगी देण्यात येत आहे. हवे असलेले दस्तऐवजाची झेरॉक्स प्रत उपलब्ध करुन देता येईल. अशी माहिती दिली आहे. परंतू त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 2.4.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये सहाय्यक अधिक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम मंडळ यांनी त्यांच्या दि. 12.4.10 च्या पत्राान्वये प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक – 1 हे असल्यामुळे त्यांचेकडे अपील अर्ज कार्यवाहीस पाठविण्यात येत आहे असे कळविलेले दिसून येते. व त्यानंतर अपीलकर्ता यांना दि. 12.5.2010 रोजी अपील सुनावणी प्रमाणे श्री पी.एम.ब्राम्हणकर उप जिल्हाधिकारी यांनी निवासस्थान सोडण्याबाबतची छायांकित प्रत श्री एम. आरमुगम अप्पर आयुक्त यांना वाटप केलेल्या निवासाचे आदेश, श्री पी. सी. काळभोर अप्पर जिल्हा दंडाधिकारी यांना वाटप केलेल्या निवासाचे वगैरे आदेश दिलेले आहे. परंतू सदरील प्रकरणे अतिशय जुनी असल्यामुळे त्याच्या नस्ती इतरत्र विखुरलेल्या आहेत त्या विहित कालावधीत शोधणे शक्य नसल्याने ती माहिती उपलब्ध करुन देता येत नाही असे कळविलेले दिसून येते. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि. 11.5.2010 रोजी माहिती अधिकारी यांचे कार्यालयात दि. 28.4.2010 रोजी झालेल्या चर्चेनुसार उप जिल्हाधिकारी श्री पी.एम.ब्राम्हणकर, अप्पर आयुक्त श्री एम. आरमुगम, अप्पर जिल्हा दंडाधिकारी श्री पी. सी. काळभोर यांना वाटप झालेल्या निवासस्थानाचे क्रमांक व धारण केलेला कालावधी या संबंधीची उपलब्ध असलेली कागदपत्रे पुरविण्यात यावे जे उपलब्ध नाहीत त्यावर भाष्य करावे असे आदेश दिलेले आहेत. परंतू अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी मागितलेली माहिती उपलब्ध झालेली नाही. परंतू मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता ती मोघम स्वरुपाची आहे व त्यातून त्यांना काय अपेक्षित आहे हे कळून येत नसल्यामुळेच जन माहिती अधिकारी यांनी जे उत्तर दिलेले आहे ते योग्य आहे. जन माहिती अधिकारी यांचेकडे झालेली चर्चा व प्रथम अपीलाचा निर्णय याबाबतचे अवलोकन केले असता अपीलकर्ता यांना तत्कालीन उप जिल्हाधिकारी श्री पी.एम.ब्राम्हणकर, अप्पर आयुक्त श्री एम. आरमुगम, अप्पर जिल्हा दंडाधिकारी श्री पी. सी. काळभोर यांना वाटप केलेल्या निवासस्थानाचा कालावधी अपेक्षित होता असे दिसून येते. व त्याप्रमाणे प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला आहे. व त्यांना ती माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. त्यावरुन अपीलकर्ता यांनी उप जिल्हाधिकारी श्री पी.एम.ब्राम्हणकर, अप्पर आयुक्त श्री एम. आरमुगम, अप्पर जिल्हा दंडाधिकारी श्री पी. सी. काळभोर यांच्या कब्जामध्ये निवासस्थान किती कालावधीपर्यंत होते व त्यांनी ते केव्हा सोडले याबाबतची माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. व ती माहिती कितीही ठिकाणी विखुरलेली असली तरी उपलब्ध

करुन देणे आवश्यक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांनी सुध्दा जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात उपस्थित होवून संबंधीत अधिका–याच्या शासकीय निवासस्थानाच्या वाटपाच्या नस्तीचे निरीक्षण करुन ती माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांना कामकाजाच्या दिवशीची तारीख व वेळ लेखी कळवून त्या दिवशी जन माहिती अधिकारी यांचेकडे उपस्थित होवून उप जिल्हाधिकारी श्री पी.एम.ब्राम्हणकर, अप्पर आयुक्त श्री एम. आरमुगम, अप्पर जिल्हा दंडाधिकारी श्री पी. सी. काळभोर याचे शासकीय निवासस्थानाच्या वाटपाच्या नस्तीचे निरीक्षण करुन त्यातील आवश्यक त्या माहितीचे छायांकित प्रती विनामुल्य उपलब्ध करुन याव्या. जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता उपस्थित झाल्यावर त्यांना वरील अधिका–याच्या नस्ती, वाटप आदेश निवासस्थान सोडण्यापर्यंतच्या सर्व नस्त्या निरीक्षणासाठी उपलब्ध करुन द्याव्या. व त्यातून आवश्यक ती माहिती छायांकित प्रतीच्या स्वरुपात विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी. तसे न केल्यास जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.800-802

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 943/2010**

श्री गुणवंत पंढरीनाथ लाडे
मु. पो. येणवा
ता. काटोल जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक
सहकारी संस्था नागपूर
धनवटे चेंबर्स, सिताबर्डी, नागपूर
2) जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक
नागपूर जिल्हा सहकारी मध्यवर्ती बॅक मर्या., नागपूर
गांधीसागर, नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 3.8.2010 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 5.7.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 9.7.2010 रोजी नोटीस काढून दि. 3.8.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व प्रथम अपीलीय अधिकारी हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक गैरहजर आहे.

2. अपीलकर्ता यांनी दि. 15.2.2010 रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा शाखा व्यवस्थापक नागपूर जिल्हा सहकारी मध्यवर्ती बॅक मर्या., यांचेकडे श्रीमती राधाबाई बालाजी लाडे यांच्या नागपूर मध्यवर्ती सहकारी बॅक बचत खाते क्र. 986 च्या संदर्भात माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 8.3.2010 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 नुसार माहिती देणे बॅकेला बंधनकारक नाही असे कळविलेले दिसून येते. त्यांमुळे अपीलकर्ता यांनी दि. 9.4.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या निर्णया दि. 29.4.2010 रोजी दिलेला आहे. त्यामध्ये अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही त्रयस्थ पक्षाची माहिती आहे तसेच बॅकींग नियमाप्रमाणे ती देता येत नाही व माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदी हया मा. उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने याचिका क्रमांक 5666/2007 च्या निर्णयाप्रमाणे

माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदी हया सहकारी बॅकांना तसेच संस्थांना लागू नसल्याचा निर्णय दिलेला आहे. व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी दिलेला निर्णय हा योग्य असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात आलेले आहे. परंतू तरीही अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. व्यवस्थापक तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचा निर्णय हा योग्य असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) प्रथम अपीलीय अधिकारी यांचा निर्णय हा योग्य असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येते.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.804-805

जा.क्र.––––––––– दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 944/2010

श्री परशराम पांडूरंग गोंडाणे
51, रामकृष्ण नगर, जयभोले आटा चक्कीजवळ,
दिघोरी, उमरेड रोड, नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक
सहकारी संस्था नागपूर
धनवटे चेंबर्स, सिताबर्डी, नागपूर
2) जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक
सहकारी संस्था नागपूर
प्लॉट नं.8, सहकार सदर, हिन्दुस्थान कॉलनी,
अमरावती रोड, नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 3.8.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 6.7.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 9.7.200 रोजी नोटीस काढून दि. 3.8.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 9.2.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक कार्यालय यांचेकडे नागपूर जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षक सहकारी पत संस्थेतील कर्मचारी भरती/पदोन्नतीच्या संदर्भात एकुण पाच मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते.

3. अर्जाच्या अनुषंगाने दि. 15.2.2010 रोजी जिल्हा उपनिबंधक सहकारी कार्यालातून अध्यक्ष/सचिव नागपूर जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षक सहकारी पत संस्था मर्या. यांना अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी म्हणून अपीलकर्ता यांचा अर्ज हस्तांतर केलेला आहे. परंतू माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 8.4.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या संदर्भात पुन्हा दि. 1.6.2010 रोजी निर्णय दिलेला असून मागितलेली माहिती ही संस्था स्तरावरील असल्याचे दिसून येते. मा. उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने याचिका क्रमांक 5666/2007 मध्ये दि. 13.1.2010 रोजी आदेश पारीत करुन माहितीचा अधिकार अधिनियम 2005 हा कायदा सहकारी

संस्थांना तसेच सहकारी बॅकांना लागू नसल्याचा निर्णय दिलेला आहे. अर्जदार यांनी मागितलेली माहिती ही संस्था स्तरावरील माहिती असल्यामुळे सदरची माहिती देणे संस्थेला बंधनकारक नाही. व त्यामुळे अर्जदार यांनी दाखल केलेले प्रथम अपील फेटाळण्यात येत आहे असा निर्णय दिलेला दिसून येतो. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. प्रथम अपीलीय अधिकारी यांचा निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) प्रथम अपीलीय अधिकारी यांचा निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.803-804

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 949/2010

श्री हरीभाऊ गोविंदराव कुटे
रामटेक (दमयंती नगर)
ता. रामटेक जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंड विकास अधिकारी
पंचायत समिती रामटेक
ता. रामटेक जि. नागपूर
2) श्री अय्यूब शहादुल्ला शेख
जन माहिती अधिकारी तथा सचिव
ग्रामपंचायत खैरी बिजेवाडा
ता. रामटेक जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 3.8.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 30.6.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 9.7.2010 रोजी नोटीस काढून दि. 3.8.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 22.4.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा सचिव ग्रामपंचायत यांचेकडे दमयंती देशमुख नगर चॅरीटेबल ट्रस्ट परसोडा (रामटेक) येथील मौजा परसोडा मौ.नं.201 प.ह.नं.38 सर्व्हे नं. 50 मध्ये समाज मंदिर बांधकामास दिलेल्या मंजूरीबाबतची माहिती एकुण सहा मुद्यांमध्ये मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दि. 13.5.2010 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतू अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे दि. 19.5.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 11.6.2010 रोजी देण्यात आलेला असून अपीलकर्ता यांनी मागणी केल्याप्रमाणे उर्वरीत माहिती 7 दिवसाचे आंत देण्यात यावी असा आदेश दिलेला दिसतो. त्यानंतर अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तीवाद करतांना असे सांगितले की त्यांना माहिती अपूर्ण मिळाली. मंजूर ले आऊटची माहिती मिळाली नाही. तसेच ग्रामपंचायतच्या

सभेची नोटिस व ठरावाच्या इतिवृत्ताची माहिती मिळाली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी सभेची नोटिस आता प्राप्त झाली आहे इतिवृत्त सुध्दा प्राप्त झालेले आहे व ती देण्यास अडचण नाही परंतू जी कागदपत्रे कार्यालयाकडे दाखल झालेली आहे तीच कागदपत्रे उपलब्ध करुन दिलेली आहे. चॅरीटेबल ट्रस्ट यांचेकडून कागदपत्रे मागवून उपलब्ध करुन देणे अपेक्षित नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांचे चॅरीटेबल ट्रस्ट यांचेकडून कागदपत्रे मागवून द्यावी हे मान्य करता येत नाही. मात्र ग्रामपंचायतच्या सभेचे इतिवृत्त व नोटिसची प्रत उपलब्ध करुन देण्या करीता सदरचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना ग्रामपंचायतच्या सभेचे इतिवृत्त व नोटिसची प्रत उपलब्ध करुन देण्यात यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.805-806

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 945/2010**

श्री विजयकुमार म. कोल्हे
453, आनंद नगर, तिरंगा चौक नागपूर व
ता. जि. नागपूर – 9 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री रामटेके
प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रादेशिक दुग्दशाळा विकास अधिकारी
नागपूर
तेलंगखेडी रोड, सिव्हील लाईन, नागपूर – 1
2) श्री राठोड
जन माहिती अधिकारी तथा महाव्यवस्थापक
शासकीय दुध योजना, नागपूर
तेलंगखेडी रोड, सिव्हील लाईन, नागपूर – 1 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 3.8.2010 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 3.7.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 9.7.2010 रोजी नोटीस काढून दि. 3.8.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 2.3.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा महाव्यवस्थापक शासकीय दुध योजना, नागपूर यांचेकडे त्यांच्या सेवा जेष्ठतेच्या संदर्भात व दुग्ध शाळा पर्यवेक्षकाच्या संदर्भात एकुण सहा मुद्यांवर माहिती मागितलेली असून माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दि. 26.3.2010 रोजी अपीलकर्ता यांना तीन मुद्यांवर माहिती तयार करुन देण्यात आलेली आहे. परंतू अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. 7.4.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 20.4.2010 रोजी देण्यात आलेला असून मुद्या क्र. 1 ते 6 ची माहिती 10 दिवसात उपलब्ध करुन देण्यात यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. त्याप्रमाणे दि. 30.4.2010 रोजी अनुक्रमांक 1 ते 5 बाबत संबंधित दस्तऐवजाच्या प्रति उपलब्ध नसल्याने देण्यात आलेल्या नाहीत व अनुक्रमांक 6 बाबत मागितलेली माहिती संदिग्ध असल्यामुळे या कार्यालयास शासकीय कामकाजाच्या वेळेस येवून सदरहू दस्तऐवजाचे अवलोकन करुन आपणास आवश्यक असलेले दस्तऐवज आपले मागणी नुसार पुरवठा करण्यात येईल असे कळविण्यात आलेले आहे. व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना त्यांच्या सेवा जेष्ठतेच्या संदर्भात किंवा संवर्गाच्या संदर्भामध्ये गुणवत्तेच्या बाबतीत युक्तीवाद केला. अपीलकर्ता यांनी माहितीच्या अर्जामध्ये मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता कागदपत्राची मागणी करतांना ती संदिग्धरित्या मागितलेली आहे. व

त्यामुळे त्यांना तशा प्रकारचे उत्तर देण्यात आलेले आहे असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी वास्तविक सुनावणी घेतांना व ते त्याच कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी असल्यामुळे मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये योग्य ती शहानिशा करुन कागदपत्रे उपलब्ध करुन न देता माहिती 7 दिवसात उपलब्ध करुन द्यावी असा संक्षिप्त व निरर्थक असा निर्णय दिलेला दिसून येतो. प्रथम अपीलीय अधिकारी यांनीच त्यांच्या स्तरावर माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता प्रयत्न केल्यास राज्य माहिती आयोगाकडे अपील करण्याची आवश्यकता अपीलकर्त्यास भासणार नाही. व तसेही सदरच्या प्रकरणात गुणवत्तेच्या संदर्भामध्ये आयोग चौकशी करु शकत नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांच्या मुद्या क्र. 1 ते 6 च्या संदर्भामध्ये कागदपत्राच्या स्वरुपात माहिती उपलब्ध आहे किंवा नाही व असल्यास कागदपत्रे उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. व त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी पुन्हा सदरच्या प्रथम अपीलाची सुनावणी घेणे संयुक्तिक राहिल. व अपीलकर्ता यांना त्यांना अपेक्षित असलेली कागदपत्रे त्याच दिवशी उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून प्रथम अपीलीय अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी व अपीलकर्ता यांचे उपस्थितीत प्रथम अपीलाची सुनावणी घेवून अपीलकर्ता यांना अपेक्षित असलेल्या कागदपत्राच्या छायांकित प्रति त्यांच दिवशी उपलब्ध होतील अशा प्रकारचा आदेश द्यावा. व कागदपत्रे उपलब्ध झाल्यावर अपीलकर्ता यांचेकडून पोच घ्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.807-808

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 950/2010**

श्री शेख सलीम शेख अकबर
इस्माइलपुरा, कामठी
ता. कामठी जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री प्रदिप डांगे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा अति.जिल्हाधिकारी
जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्रीमती आशा पठाण
जन माहिती अधिकारी तथा मतदार नोंदणी अधिकारी
58 कामठी विधानसभा मतदार संघ, नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 3.8.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 2.7.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 9.7.2010 रोजी नोटीस काढून दि. 3.8.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 11.1.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी 58 कामठी विधानसभा मतदार संघ यांचेकडे लोकसभा निवडणूक मतदार दिवस में ईस्माइलपुरा नगर परिषद शाला मतदान केंद्र में अडचण निर्माण बाबत. क्षेत्रीय अधिकारी, प्रीसायडींग ऑफीसर और शिपाई उस मतदान केंद्र पर मौजूद था उसके अनुसार मतदान केंद्र के क्षेत्रीय अधिकारी, प्रीसायडींग ऑफीसर और सिपाई ने आपके कार्यालय में तक्रार की जो मेरे खिलाफ तक्रार की सत्य प्रत कॉपी की माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दि. 16.1.2010 रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतू अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. 3.2.2010 रोजी आक्षेप घेणारे पत्र दिले. पुन्हा दि. 5.2.2010 रोजी माहिती उपलब्ध करुन देण्यात आली असे कळविण्यात आले. परंतू अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. 15.3.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 15.4.2010 रोजी देण्यात आलेला असून अपील मंजूर करण्यात येवून लोकसभा निवडणूक 2009 रोजी अपीलार्थीचे नावे प्राप्त तक्रारीची प्रत उपलब्ध असल्यास ती अपीलार्थीस निशुल्क पुरवावी किंवा तक्रारीची प्रत त्यांचेकडे नसल्यास तसे कळवावे असे आदेश देण्यात आले आहेत. व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना दि. 10.5.2010 रोजी लोकसभा निवडणूकीच्या वेळेस कोणतीही तक्रार त्यांच्या कार्यालयात प्राप्त झाली नाही व त्यामुळे उपलब्ध नाही अशी माहिती दिलेली आहे. परंतू तरीही अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. व आज लेखी निवेदन सुध्दा सादर केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी लोकसभा निवडणूकीच्या वेळेस ची माहिती मागितलेली होती परंतू त्यांना विधानसभा निवडणूकीच्या वेळेस ची माहिती दिलेली आहे. व ती दिशाभूल करणारी व चुकीची आहे. मात्र प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे लोकसभा निवडणूकी मध्ये निवडणूकीच्या वेळेस कोणतीही तक्रार त्यांचे विरुध्द नव्हती व त्यामुळे ती कार्यालयात उपलब्ध नाही असे कळविण्यात आलेले आहे. परंतू जन माहिती अधिकारी यांनी चुकीची माहिती उपलब्ध करुन दिली त्यामुळे त्यांचे विरुध्द शास्ती लादण्यात यावी अशी विनंती केली. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की लोकसभा निवडणूकीच्या वेळेस अपीलकर्ता यांचे विरुध्द कोणतीही तक्रार कार्यालयात दाखल नाही व त्यामुळे तसे त्यांना कळविणे आवश्यक होते. गैरसमजूतीतून त्यांना विधानसभा निवडणूकीच्या वेळेस त्यांचे विरुध्द जी तक्रार आलेली होती त्या तक्रारीच्या संदर्भामध्ये त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली होती. याबाबतचा विचार केल्यास अपीलकर्ता यांना चुकीची माहिती उपलब्ध करुन दिली असे म्हणण्यापेक्षा अधिकची माहिती त्यांना उपलब्ध करुन दिलेली आहे व प्रथम अपीलाच्या निर्णया नंतर त्यांना योग्य ती माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. व त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे निकाली काढण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.819-820

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 959/2010

श्री कृष्णा हेमराज कनोजिया
बुध नगर आनंद बुध्द विहाराजवळ
पो. आंबेडकर मार्ग नागपूर
ता. जि. ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी
ग्राम विकास व जलसंधारण विभाग
मंत्रालय मुंबई 32
2) जन माहिती अधिकारी तथा
ग्राम विकास व जलसंधारण विभाग
मंत्रालय मुंबई 32 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 4.8.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 9.7.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 12.7.2010 रोजी नोटीस काढून दि. 4.8.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी हजर आहेत. संवर्ग विकास अधिकारी पंचायत समिती तर्फे श्रीमती कांचन वरठी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 15.3.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास व जलसंधारण विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडे श्री बी. बी. येनोरकर कनि. अभियंता दि. बा. बैलनवार सचिव ता.जि.चंद्रपूर यांनी रोहयो योजनेत रोड बांधकाम तसेच इतर बांधकामात अपहार केला होता. तपशिल सोबतच्या सहपत्रामध्ये दिलेला आहे. त्याची माहिती अति शिघ्र टपालाद्वारे घेणार असे नमूद करुन मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांचा अर्ज दि. 6 मे 2010 रोजी कक्ष अधिकारी ग्राम विकास व जलसंधारण विभाग यांनी रोजगार हमी योजना नियोजन विभागाशी संबंधित असल्यामुळे त्या विभागाकडे हस्तांतरीत करण्यात आला असल्याचे अर्जदारास कळविले. त्यानंतर दि. 27.7.2010 रोजी कक्ष अधिकारी नियोजन विभाग यांनी सदरचा अर्ज मुख्य कार्यकारी अधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा चंद्रपूर यांचेकडे कार्यवाहीसाठी पाठविला. दि. 29.7.2010 रोजी संवर्ग विकास अधिकारी चंद्रपूर यांनी अपीलकर्ता यांना सदर अहवालाची प्रत आपणास दि. 18.6.2009 ला राज्य माहिती आयुक्त खंडपीठ

नागपूर यांचे कार्यालयात सुनावणीच्या वेळी देण्यात आली आहे त्याची प्रत पुनश्च या सोबत पाठविण्यात येत आहे असे कळविलेले दिसून येते. परंतू विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 4.5.2010 रोजी प्रथम अपील प्रथम दाखल केले होते. परंतू प्रथम अपीलाचा निर्णय झालेला नाही मात्र अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे कळविण्यात आले. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना आयोगापुढे असे सांगितले की त्यांना मा. श्री सुधीर ठाकरे सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग मंत्रालय मुंबई यांना नागपूर अधिवेशनाच्या दरम्यान तक्रार दिलेली होती व त्या तक्रारीची चौकशी झाली किंवा नाही व अहवाल झाला किंवा नाही याबद्यलची माहिती मिळालेली नसल्यामुळे ती माहिती मागितलेली होती व ती माहिती अद्यापपर्यंत त्यांना मिळालेली नाही. सदरच्या कागदपत्रावरुन अवलोकन केले असता अपीलकर्ता यांनी केलेल्या अर्जाचे हस्तांतर हे नियोजन विभागाकडे करण्यात आले होते व नियोजन विभागाकडून पुढे अर्ज चौकशीस पाठविण्यात आला त्यामुळे मुख्य कार्यपालन अधिकारी जिल्हा परिषद यांचेकडे माहिती उपलब्ध करुन द्यावी म्हणून कळविण्यात आलेले होते. त्यामुळे आज सुनावणीस पुन्हा कक्ष अधिकारी नियोजन विभाग मुंबई हे हजर आहेत. तसेच सदरची तक्रार ही मुख्य कार्यपालन अधिकारी जिल्हा परिषद यांचेकडून संवर्ग विकास अधिकारी यांचेकडे चौकशी करीता पाठविण्यात आली होती. व संवर्ग विकास अधिकारी यांनी चौकशी अधिकारी नियुक्त करुन चौकशी अहवाल सादर केलेला आहे. तो चौकशी अहवाल हा अपीलकर्ता यांना संवर्ग विकास अधिकारी यांनी दि. 29.7.2010 रोजी दिलेला आहे. तरीही अपीलकर्ता यांनी पुन्हा वरील अर्जाप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. अपीलकर्ता यांचे या संदर्भातील अपील क्र. 893/2008, अपील क्र. 2551/2007 व अपील क्र. 752/2009 हे अंशतः मंजूर करण्यात आले आहे किंवा खारीज करण्यात आले आहे. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की अद्यापपर्यंत माहिती उपलब्ध झालेली नाही म्हणून त्यांनी तक्रार सुध्दा केलेली होती. परंतू तक्रारीच्या वेळेस चौकशी सुरु असल्यामुळे माहिती उपलब्ध करुन देता आलेली नाही. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की अहवाल जो दिलेला आहे त्या अहवाला मध्ये तारीख दिलेली नाही व कोणत्याही प्रकारे अहवाल अधिकृत आहे असे त्यावर काहीही चिन्ह नाही व अहवालाच्या सोबत तो अहवाल कशाच्या आधारे केलेला आहे त्याबाबतचे कोणतेही कागदपत्र किंवा बयाणाचा अधिकृत अहवाल दिलेला नाही. दुस-या तक्रारीच्या बाबतीत चौकशी सुरु आहे असे चौकशी अधिकारी यांनी सांगितले. चौकशी अहवाल देतांना जी सोबतची कागदपत्रे दाखल झालेली असतात ती सर्वच कागदपत्रे उपलब्ध करुन देणे आवश्यक असते. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना दि. 18.6.2009 रोजी जो अहवाल उपलब्ध करुन दिलेला आहे त्या अहवालाच्या सोबत घेतलेले बयाण तसेच चौकशी अधिका–याने चौकशी केलेल्या प्रक्रियेची कागदपत्रे हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत संवर्ग विकास अधिकारी पंचायत समिती यांनी चौकशी अधिका–याकडून उपलब्ध करुन घेवून विनामुल्य रजिस्टर पोस्टानी उपलब्ध करुन देण्यात यावे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.827-829

जा.क्र.––––––––– दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 964/2010

श्री गोपीचंद वामनराव भांदककर
122 कलेक्टर कॉलनी गोधनी नागपूर
ता. जि. 441111 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री भोंडे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता
सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.1 नागपूर
सदर नागपूर
2) श्री साखरवार
जन माहिती अधिकारी
सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.1 नागपूर
सदर नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 4.8.2010 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 7.7.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 12.7.2010 रोजी नोटीस काढून दि. 4.8.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 6.5.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.1 नागपूर यांचेकडे एन.एम.व्ही कॉलेज मधील नुतनीकरणाच्या संदर्भामध्ये एकुण 13 मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 22.6.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. व त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की त्यांना अद्यापपर्यंत माहिती उपलब्ध झालेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता यांनी असे सांगितले की दि. 1.4.2010 पासून कार्यकारी अभियंता हे प्रथम अपीलीय अधिकारी असल्यामुळे माहितीचा अर्ज हा दि. 12.5.2010 रोजी त्यांचेकडे वर्ग करण्यात आला. अपीलकर्ता यांनी त्यांच्या अर्जामध्ये दारिद्रय रेषेखालील असल्याचे नमुद केलेले

असल्यामुळे पुरावा सादर करण्याचे कळविले. त्याबाबतचा खुलासा त्यांनी दि. 31.5.2010 रोजी दिलेला असून आवश्यक ते शुल्क भरण्यास तयार आहे असे कळविण्यात आले. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये सुनावणी झालेली नाही व निर्णय झालेला नाही. त्यामुळे प्रथम अपीलाची सुनावणी घेवून अपीलकर्ता यांना जी माहिति हवी आहे त्या माहितीच्या संदर्भामध्ये त्यांना पृष्ठ संख्या व प्रती पृष्ठ 2 रु. प्रमाणे खर्च कळवून खर्चाचा भरणा करुन घेवून त्याच दिवशी माहिति उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल.

**आ दे श**

1) प्रथम अपीलीय अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत प्रथम अपीलाची सुनावणी घेवून अपीलकर्ता यांना पृष्ठाचे विवरण व प्रती पृष्ठ 2 रु. प्रमाणे खर्च कळवून उपलब्ध असलेली माहिति त्याच दिवशी उपलब्ध करुन देण्यात यावी. पुन्हा तक्रार आल्यास जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिति आयुक्त,**
**राज्य माहिति आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.831-832

जा.क्र.––––––––– दि..................
मा. राज्य माहिति आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिति आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 960/2010**

श्री पुरुषोत्तम मारोतराव नंदेश्वर
विक्रमशिला नगर, बोधिसत्व बुध्द विहाराजवळ,
सिदी (मेघे) वर्धा
ता. जि. वर्धा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री राजेन्द्र बी. सनेर पाटील
प्रथम अपीलीय अधिकारी तथा महाव्यवस्थापक(क व औ.सं)
रा.प.मध्यवर्ती कार्यालय
महाराष्ट्र वाहतुक भवन, सेंट्रल, मुंबई 8.
2) जन माहिती अधिकारी तथा मुख्य कर्मचारी वर्ग अधिकारी
रा.प.मध्यवर्ती कार्यालय
महाराष्ट्र वाहतुक भवन, सेंट्रल, मुंबई 8. ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 4.8.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 2.7.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 12.7.2010 रोजी नोटीस काढून दि. 4.8.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 18.3.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्य कर्मचारी वर्ग अधिकारी रा.प.मध्यवर्ती कार्यालय यांचेकडे 1. दि. 4.10.2009 ला घेतलेल्या खाते मार्फत डी.पी.ओ. च्या परीक्षेत कोणत्या परीपत्रकाच्या आधारावर नापास केले त्याची प्रत. 2. खात्या मार्फत परीक्षा पास करण्याकरीता किती मार्क आवश्यक आहे हयाची प्रत. 3. डी.पी.ओ. व ई.एस. यांचे Work Allocation काय आहे त्याची प्रत. अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती टपालाने घेणार असे नमूद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 17.5.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दि. 28.7.2010 रोजी निर्णय दिलेला असून आवश्यक ते शुल्क भरणा केल्याची पावती सादर केल्यावर अपीलार्थीस माहिती द्यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. व त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांच्या तर्फे ॲड. अे. एच. जमाल हे हजर झालेले आहेत व त्यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की अपीलकर्ता यांना आतापर्यंत काहीही माहिती मिळालेली नाही. जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी हे हजर झाले असून त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्ता यांच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 16.4.2010 रोजी माहितीच्या करीता अतिरिक्त खर्च रु. 44/— चा भरणा कार्यालयात करुन ती पावती कार्यालयात सादर करण्याबाबत त्यांच्या घराच्या पत्त्यावर पोस्टाने कळविले होते पुरावा म्हणून जावक नोंदवहीची झेरॉक्स प्रत

जोडली आहे पण त्यांनी रक्कम भरली नाही मात्र प्रथम अपील सादर केले. प्रथम अपीलाची सुनावणी ही खात्या अंतर्गत बढतीसाठी परीक्षा घेण्याबाबत कार्यवाही सुरु असल्याने सुनावणी घेण्यास विलंब झाला. सुनावणी त्यानंतर दि. 28.7.2010 रोजी घेण्यात आली. सुनावणीस ते हजर झाले नाही. त्यांना फॅक्स द्वारे कळविण्यात आले परंतू फॅक्स घेण्यास त्यांनी नकार दिला व ते गैरहजर राहिले. त्यानंतर एकतर्फी निर्णय घेवून अपीलकर्ता यांना त्यांच्या घरच्या पत्त्यावर दि. 28.7.2010 रोजी माहिती देण्यात आली होती. ती पोचदेय पत्राने पाठविण्यात आली. त्यानंतर पोस्टाने पाठविल्याची सुध्दा नोंदीची झेरॉक्स प्रत आहे. परंतू अपीलकर्ता यांनी त्यांना कोणतेही पत्र आतापर्यंत मिळाले नाही असे आयोगापुढे सांगितले. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांना इतर सर्व पत्रे मिळाली परंतू खर्चाच्या भरण्याचे पत्र किंवा पाठविलेली माहिती मिळाली नाही. परंतू या सर्व दस्तऐवजाच्या संदर्भामध्ये जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी पोस्टाचा जावक नोंदवहीचा पुरावा सादर केलेला असल्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती पाठविण्यात आलेली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. परंतू महाव्यवस्थापक यांनी असे सांगितले की त्यांना पुन्हा माहिती पाहिजे असल्यास ती उपलब्ध करुन देता येईल. ते परीपत्रक कार्यालयाचे आहे व अपीलकर्ता सुध्दा त्यांचे कार्यालयामध्ये सेवेत आहे. तरी त्यांना सदरचे परीपत्रक व मागितलेली माहिती पुन्हा उपलब्ध करुन देण्याचे मान्य केलेले असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.822-823

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 958/2010**

श्री गुलाब रामदास डोंगरे
266, कुकडे लेआऊट, रामेश्वरी रोड
पो. भगवान नगर नागपूर
ता. जि. नागपूर 440027 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री नयसींग ठाकूर
प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपनिबंधक
सहकारी संस्था, नागपूर शहर 2
प्लॉट नं. 8, सहकार सदर, हिंदुस्थान कॉलनी,
टमरावती रोड, नागपूर.
2) जन माहिती अधिकारी तथा प्रमुख कार्यवाहा
ठवरे गृह निर्माण सहकारी संस्था, नागपूर
सुभेदार लेआऊट, ठवरे कॉलनी,
नासिकनगर नागपूर 440024 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 4.8.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 8.7.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 12.7.2010 रोजी नोटीस काढून दि. 4.8.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. जन माहिती अधिकारी गृह निर्माण सहकारी संस्था गैरहजर. प्रथम अपीलीय अधिकारी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 3.11.2009 रोजी जन माहिती अधिकारी श्री न. दा. वाहणे प्रमुख कार्यवाहा ठवरे गृह निर्माण सहकारी संस्था, नागपूर यांचेकडे संस्थेचे मुळ सभासद श्री रामदास किसन डोंगरे यांना संस्थेतून बेदखल केल्या प्रकरणी श्री रामदास किसन डोंगरे यांनी व त्यांच्या मुलाने उपनिबंधक सहकारी संस्था, शहर 1 नागपूर यांना पुरविलेल्या संस्थेचे दस्ताऐवज व माहिती नुसार अर्जदाराला आपल्या संस्थेच्या संपूर्ण अभिलेखाचे (पडताळणी) निरीक्षण करण्याकरीता अर्जदाराला आपल्या सोईची तारीख व वेळ कळविण्यात यावी. संपूर्ण अभिलेख निरीक्षणा अंती आवश्यक नोंदीच्या साक्षांकित प्रतीची मागणी करण्यात येईल अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः हवी आहे असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी उपनिबंधक

सहकारी संस्था, नागपूर यांचेकडे दि. 2.1.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दि. 27.1.2010 रोजी निर्णय झालेला असून ठवरे गृह निर्माण सहकारी संस्थेने त्यांना दि. 3.11.2009 च्या अर्जाद्वारे मागितलेली माहिती आवश्यक त्या रकमेचा भरणा करुन पुरविण्यात यावी असा आदेश दिलेला दिसून येतो. परंतू त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की त्यांचे वडील हे संस्थेचे संस्थापक सभासद असून सुध्दा त्यांना सभासद करुन घेण्यात आले नाही व संस्थेतून बेदखल केले त्यामुळे त्यांनी उपनिबंधकाकडे तक्रार केली होती तसेच संस्थेकडे कागदपत्राचे निरीक्षण करण्याकरीता अर्ज केला. परंतू संस्थेनी निरीक्षण करण्यास काहीही प्रतिसाद दिलेला नाही किंवा प्रथम अपीलाच्या निर्णया नंतर सुध्दा अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. दाखल केलेल्या कागदपत्रा वरुन असे दिसून येते की संस्थेचे सचिव, उपनिबंधक यांचेकडे प्रथम अपीलाच्या सुनावणीस हजर होते व त्यांनी डॉ. पंजाबराव देशमुख अर्बन को.ऑपरेटिव्ह बॅक लि. विरुध्द राज्य माहिती आयोग या प्रकरणात मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ नागपूर च्या निर्णया प्रमाणे संस्थेना माहितीचा अधिकार अधिनियम 2005 हा लागू होत नाही असा निर्णय दिलेला असल्यामुळे अपील खारीज करण्यात यावे अशी विनंती केलेली आहे. परंतू अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की संस्थेस सक्करदरा येथील ख. नं. 80/2 ची नझूलची 4 एकर जमीन 1965 मध्ये भाडेतत्वावर देण्यात आली व त्यामुळे सदर गृह निर्माण सहकारी संस्थेने शासनाकडून मदत प्राप्त केली आहे या कारणास्तव प्रथम अपील मान्य केलेले असून माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले दिसून येतात. माहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था यांनी राज्य माहिती आयोगाकडे खुलासा सादर करतांना संस्थेच्या दि. 22.1.2010 रोजीच्या पत्रानुसार ख. नं. 80/2 ची नझूलची 4 एकर जमीन रु. 54.45 वार्षीक भाडयाने भाडेतत्वावर संस्थेस 1965 मध्ये देण्यात आली असे संस्थेच्या पत्रात नमूद आहे. व त्यामुळे सदर गृह निर्माण सहकारी संस्थेला शासनाकडून मदत प्राप्त झाल्याने व दोन्ही बाजू लक्षात घेता माहितीचा अधिकार लागू होत आहे असा खुलासा केलेला आहे.

4. अपीलकर्ता यांनी सुध्दा आज आयोगापुढे महाराष्ट्र शासनाचा निर्णय महसूल व वनविभाग 13 डिसेंबर 1965 ची प्रत आयोगापुढे सादर केली. त्यामध्ये ठवरे गृह निर्माण सहकारी संस्थेस ख. नं. 80/2 मौजा सक्करदरा येथील 4 एकर जमीन वार्षीक नाममात्र भाडेपटटयावर दिलेली आहे याबाबतची शासन निर्णयाची प्रत सादर केली. व यावरुन सदरच्या संस्थेस शासकीय मदत दिलेली असल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 2 (ज) मधील ''सार्वजनिक प्राधिकरण '' या संज्ञेच्या व्याख्येमध्ये समाविष्ट होत असल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 लागू होतो व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत श्री न. दा. वाहणे प्रमुख कार्यवाहा ठवरे गृह निर्माण सहकारी संस्था, नागपूर यांनी अपीलकर्ता यांना संस्थेच्या संपूर्ण अभिलेख्याचे (पडताळणी) अधिनियमाच्या कलम 2 (त्र) प्रमाणे निरीक्षण करण्या करीता उपलब्ध करुन देण्यात यावे. त्याकरीता अपीलकर्ता यांनी संस्थेस एखाद्या रविवारची वेळ लेखी कळवून उपस्थित होवून अभिलेख्याचे निरीक्षण करुन आवश्यक त्या कागदपत्राची मागणी योग्य खर्चाचा भरणा करुन घ्यावी.

2) अपीलकर्ता यांनी संस्थेस लेखी कळविल्या नंतर अपीलकर्ता यांना संस्थेचे कार्यवाहा यांनी किंवा माहिती अधिकारी नियुक्त करुन माहिती अधिकारी यांनी निरीक्षणासाठी संस्थेचे अभिलेखे उपलब्ध करुन देण्यात यावे. तसे न केल्यास माहिती अधिकारी यांचे विरुध्द किंवा पदाधिका–या विरुध्द शास्ती लादण्यात येईल किंवा महाराष्ट्र सहकारी संस्था 1965 प्रमाणे जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांना कार्यवाही करण्याची शिफारस करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.824-826

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 990/2010

श्री सुरेश मोरेश्वर मल्लेरवार
मु. पो. विठ्ठलवाडा
ता. गोंडपिपरी जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी(महसूल)
चंद्रपूर ता. जि. चंद्रपूर
2) जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार
तहसिल कार्यालय गोंडपिपरी
ता. गोंडपिपरी जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 9.8.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 13.7.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 20.7.2010 रोजी नोटीस काढून दि. 9.8.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 12.5.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार तहसिल कार्यालय गोंडपिपरी यांचेकडे विठ्ठलवाडा येथील स्वस्त धान्य दुकान व रॉकेल बाबत सन 2009 ते 2010 या कालावधीतील माहिती साधारण टपालाने मागितलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 24.6.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 22.7.2010 रोजी देण्यात आलेला असून 7 दिवसाचे आंत माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले दिसून येतात. व त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तीवाद करतांना असे सांगितले की त्यांना माहिती उपलब्ध झाली परंतू ती विलंबाने उपलब्ध झालेली आहे. आज जन माहिती अधिकारी ग्रामपंचायतच्या निवडणूकीच्या कारणावरुन हजर झालेले नाहीत. त्यांचे अव्वल कारकून हजर आहेत व त्यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांना दि. 9.6.2010 रोजी विहित मुदतीत शुल्क भरण्यासाठी कळविण्यात आले होते. परंतू संबंधित कोतवालाने श्री मल्लेवार हे विठ्ठलवाडा येथे नेहमी करीता राहात नाही त्यामुळे पत्राची तामील करता

आली नाही. परंतू त्यानंतर दि. 7.7.2009 रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतू तीही बाब प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये दिसून आलेली नाही. कारण जन माहिती अधिकारी हे प्रथम अपीलाच्या सुनावणीस हजर राहिलेले नाही. माहिती उपलब्ध करुन दिली किंवा नाही ही सिध्द करण्याची जबाबदारी जन माहिती अधिकारी यांची अधिनियमाच्या कलम 19 (5) प्रमाणे असते. व त्यामुळे प्रथम अपीलाच्या सुनावणीस सुध्दा उपस्थित राहून माहिती उपलब्ध करुन दिली हे सांगणे बंधनकारक होते. परंतू माहिती दिली नाही हा प्रथम अपीलाचा निष्कर्ष योग्य असल्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी तहसिलदार किंवा त्यास जबाबदार असणारे अधिकारी किंवा कर्मचारी यांचे विरुध्द जबाबदारी निश्च्त्ति करुन रु. 1000/— ची शास्ती लादणे आवश्यक आहे. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी यांनी किंवा ते ज्या अधिकारी किंवा कर्मचारी यांचे सहाय्य घेतात अशा अधिकारी किंवा कर्मचारी यांचे विरुध्द जबाबदारी निश्चित करुन अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे रु. 1000/— ची शास्ती लादण्यात येते. सदरच्या शास्तीची वसुली ही उपविभागीय अधिकारी यांनी करावयाची असून लेखाशिर्ष ''0070—इतर प्रशासनिक सेवा, 60, इतर सेवा, 800, इतर जमा रकमा, (18) माहितीचा अधिकार (0070—016'1)'' मध्ये जमा करावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.829-830

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 986/2010**

श्री प्रशांत देवीदास जिवणे
चंद्रमणी नगर मार्ग क्र. 8 एल,
पो. भगवाननगर नागपूर
ता. जि. नागपूर 440027 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री मदन गवते
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
डॉ. आंबेडकर इन्स्टिटयूट ऑफ सोशल वर्क्स, नागपूर
कैलास नगर, ता. जि. नागपूर 440027
2) श्री धनजय डुंबरे
जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य
डॉ. आंबेडकर इन्स्टिटयूट ऑफ सोशल वर्क्स, नागपूर
कैलास नगर, ता. जि. नागपूर 440027 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 9.8.2010 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 9.7.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 20.7.2010 रोजी नोटीस काढून दि. 9.8.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 9.2.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य डॉ. आंबेडकर इन्स्टिटयूट ऑफ सोशल वर्क्स, नागपूर यांचेकडे महाविद्यालयातील जोडपत्र 'अ' मध्ये दिलेल्या मुद्यांची माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 19.3.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये जी माहिती गोपनिय अथवा व्यक्तीगत नाही व महाविद्यालयामध्ये उपलब्ध आहे ती देण्याचे निर्देश दिलेले असून त्याप्रमाणे माहिती अधिका–यानी माहिती व्यक्तिशः उपलब्ध केलेली आहे. परंतू प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. द्वितीय अपीलाच्या सुनावणीत अपीलकर्ता यांनी असे सांगितले की मागितलेली माहिती त्यांना अद्यापपर्यंत उपलब्ध झालेली नाही. परंतू सदरची माहिती महाविद्यालयात उपलब्ध करुन देता आली नाही असे प्रबंधक यांनी आयोगापुढे सांगितले. परंतू माहिती उपलब्ध आहे किंवा नाही ही बाब 30 दिवसाचे आत अपीलकर्ता यांना कळविणे आवश्यक होते हे ही सर्वसाधारण ज्ञान प्रबंधका सारख्या अधिका–यांना नाही याबाबत आश्चर्य वाटते. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी निर्णय दिलेला नाही परंतू आयोगाकडे खुलासा केला आहे की प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे आदेश दिलेला आहे. परंतू प्राचार्य व प्रबंधक यांनी माहिती उपलब्ध करुन देण्याची टाळाटाळच केलेली आहे. प्रबंधक यांनी असे

सांगितले की आता त्यांची पहीलीच वेळ असल्यामुळे त्यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. परंतू ते शिकलेले दिसून येतात. व त्यामुळे 30 दिवसामध्ये माहिती द्यावयाची असते ही बाब त्यांना माहित असणे आवश्यक होते. व त्यामुळे त्यांचेविरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे रु. 1000/– ची शास्ती लादणे आवश्यक आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की जी माहिती महाविद्यालयात उपलब्ध आहे ती माहिती त्यांना उपलब्ध करुन देण्यात येत आहे. असे असले तर अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही व त्यामुळे अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे ते दोषी आढळून येत असल्यामुळे त्यांचे विरुध्द रु. 1000/–शास्ती लादण्यात येते. सदरच्या शास्तीची वसुली ही त्यांचे दरमहाचे वेतनातून प्राचार्य यांनी वसुल करावयाची असून लेखाशिर्ष ''0070–इतर प्रशासनिक सेवा, 60, इतर सेवा, 800, इतर जमा रकमा, (18) माहितीचा अधिकार (0070–016'1)'' मध्ये जमा करण्यात यावी.
2) प्राचार्य यांनी प्रथम अपीलीय अधिकारी म्हणून आयोगाची सुध्दा दिशाभूल करण्याचा प्रयत्न केलेला असल्यामुळे त्यांचे विरुध्द प्रशासकीय कार्यवाही विभागीय समाज कल्याण नागपूर यांनी करावी.
3) सदरच्या निर्णयाची एक प्रत **विभागीय समाज कल्याण नागपूर** यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावी.
4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.832-833

जा.क्र.––––––––– दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 996 नाग/2010

श्री उमेश्वर भागवतराव मडके
मु. मोगरा पो. येनिकोनी
ता. नरखेड जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री ब. शे. घाटे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा वरिष्ठ संशोध अधिकारी
अपर आयुक्त, आदिवासी विकास कार्यालय नागपूर
गिरीपेठ नागपूर
2) श्री एस. एन. गेडाम
जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक प्रकल्प अधिकारी
अपर आयुक्त, आदिवासी विकास कार्यालय नागपूर
गिरीपेठ नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 10.8.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 13.7.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 20.7.2010 रोजी नोटीस काढून दि. 10.8.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 25.2.2007 रोजी जन माहिती अधिकारी अपर आयुक्त कार्यालय, आदिवासी विकास नागपूर यांचेकडे विजय केसरी आदिवासी विकास बहुउद्येशिय संस्था द्वारा संचालित स्व. श्री गंगाधरराव कोरडे आदिवासी आश्रमशाळा, पिठोरी येथिल कर्मचारी नेमणूकीविषयी सन 1999 ते 2010 पर्यंत एकुण 17 मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने माहिती ही संस्था स्तरावरील असल्यामुळे माहिती अधिकारी यांनी दि. 19.3.2010 रोजी सचिव विजय केसरी तथा मुख्याध्यापक यांनी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी त्याबद्यलचे पत्र दिलेले दिसून येते. परंतू माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे पुन्हा दि. 31.3.2010 रोजी मुख्याध्यापक, अनुदानित आश्रमशाळा, पिठोरी यांना स्मरणपत्र दिलेले दिसून येते. दि. 5.5.2010 रोजी संस्थेचे सचिव यांनी आमची संस्था बॉम्बे ट्रस्ट ॲक्ट अंतर्गत पब्लीक ट्रस्ट म्हणुन रजिष्टर्ड आहे. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 हा संस्थेला लागु नसल्यामुळे या कायद्यानुसार मागितलेली माहिती तुम्हाला पुरविण्यात येत नाही असे कळविलेले दिसून येते. त्याच दिवशी दि. 5.5.2010 रोजी मागितलेली

माहिती संस्थेबाबत आहे. संस्था याचेवर कायदे अंतर्गत उचित माहिती देणार असे कळविलेले आहे. कर्मचा–याची माहिती ही त्याची वैयक्तिक माहिती असल्यामुळे आणि तुमच्याशी कसलाही संबंध नसल्यामुळे त्या अधिनियमात येत नाही असे मुख्याध्यापक यांनी कळविलेले दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 30.3.2010 रोजीच प्रथम अपील दाखल केले होते. परंतू प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये संस्था सचिव व मुख्याध्यापक यांनी माहिती द्यावी असा निर्णय दिलेला असल्यामुळेच वरीलप्रमाणे त्यांना कळविलेले दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की संस्था स्तरावरील ही माहिती नसून माहिती प्रकल्प अधिकारी यांचेकडे उपलब्ध असते. परंतू माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की अशा अनेक संस्था असल्यामुळे सर्वच संस्थेची माहिती कार्यालयात उपलब्ध नसते व ती माहिती ही त्या त्या संस्था स्तरावरच असते. व त्यामुळेच अपीलकर्ता यांचा अर्ज हा त्या संस्थेकडे हस्तांतर करण्यात आलेला आहे. प्रथम अपीलाच्या सुनावणीत सचिवांनी अर्ज प्राप्त झाला नाही व प्राप्त झाल्यावर माहिती देण्यात येईल असे सांगितल्यावर माहिती देण्याची टाळाटाळ केलेली आहे. व त्यामुळे संस्थेचे पदाधिकारी हे शास्तीस पात्र आहेत. तसेच संस्था ही बॉम्बे ट्रस्ट ॲक्ट अंतर्गत पब्लीक ट्रस्ट म्हणुन पंजीबध्द आहे व त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 हा हा कायदा संस्थेला लागु होत नाही असे जे सचिवानी कळविलेले आहे त्या संदर्भामध्ये ज्या पब्लीक ट्रस्टना शासकीय अनुदान मिळत नाही त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम 2005 लागु होत नाही. याबाबतची माहिती सचिवानी करुन घेणे आवश्यक आहे व तरीही तसे त्यांचे मत असल्यास अपर आयुक्त, आदिवासी विकास यांनी सदरच्या संस्थेचे अनुदान काढून घेण्याच्या संदर्भात शासनाकडे शिफारस करणे आवश्यक असून संस्थेची मंजूरी काढून घेण्याची सुध्दा कार्यवाही करणे सुध्दा आवश्यक आहे. व त्यामुळे सदरचे अपील मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून सदरच्या संस्थेनी प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत अपीलकर्ता यांना मुद्येनिहाय माहिती कागदपत्राच्या स्वरुपात विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

2) प्रथम अपीलीय अधिकारी तथा वरिष्ठ संशोधन अधिकारी अपर आयुक्त, आदिवासी विकास कार्यालय यांनी आदेश देवून सुध्दा माहिती उपलब्ध करुन देण्याची टाळाटाळ केलेली असल्यामुळे त्यांना अधिनियमाच्या कलम 5 (4) (5) प्रमाणे जन माहिती अधिकारी समजून त्यांचे विरुध्द प्रत्येकी रु. 1000/– ची शास्ती लादण्यात येते. सदरच्या शास्तीची वसुली अपर आयुक्त, आदिवासी विकास कार्यालय यांनी करावयाची असून लेखाशिर्ष ''0070–इतर प्रशासनिक

सेवा, 60,इतर सेवा, 800, इतर जमा रकमा, (18) माहितीचा अधिकार (0070–016'1)'' मध्ये जमा करण्यात यावी.

3) संस्थेचे सचिव यांची धारणा संस्थेस कायदा लागू होत नाही अशी असल्यामुळे व प्रथम अपीलीय अधिकारी तथा वरिष्ठ संशोधन अधिकारी अपर आयुक्त, आदिवासी विकास यांचे माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश सुध्दा संस्थेचे सचिव व मुख्याध्यापक यांनी पाळलेले नसल्यामुळे संस्थेचे अनुदान तसेच मान्यता काढून घेण्याची कार्यवाही सुरु करावी तसे न केल्यास सार्वजनिक प्राधिकरणातील अधिकारी म्हणजे अपर आयुक्त, आदिवासी विकास यांचे विरुध्द अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.835-837

जा.क्र.––––––––– दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 998/2010

श्री सुधाकर नामदेवराव बावणे
श्री वामनराव बल्की यांचे घरी
मु. जुनी कामठी पो. गोंडेगाव
ता. पारशिवनी जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) डॉ. एन. रामबाबू
प्रथम अपीलीय अधिकारी तथा वनसंरक्षक
नागपूर वन विभाग, नागपूर
शासकीय मुद्रणालय जवळ, सिव्हील लाईन्स, नागपूर
2) श्री भलावी
जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय वन अधिकारी
नागपूर वन विभाग, नागपूर
शासकीय मुद्रणालय जवळ, सिव्हील लाईन्स, नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 10.8.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 12.7.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 20.7.2010 रोजी नोटीस काढून दि. 10.8.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 26.11.2009 रोजी जन माहिती अधिकारी वन विभाग, नागपूर वृत्त नागपूर यांचेकडे सन 1994 ते 1998 पर्यंतचे एकुण 5 वर्षाचे प्रतिकुल शेरेची माहिती देण्यात यावी. तसेच दि. 22.5.98 ला 12 वर्षे पूर्ण होत आहे. परंतु कालबध्द पदोन्नती दि. 1.4.03 पासून का देण्यात येत आहे हया बाबद कळवावे. दि. 22.5.1998 ला 12 वर्षे पूर्ण होत असतांना अजुनपर्यंत कालबध्द पदोन्नती का देण्यात आली नाही याबाबत कळवावे. देण्यात आली ती चुकीचा निर्णय घेवून चुकीच्या दिनांका पासुन देण्यात आली. असे का त्याबद्यल सविस्तर कळवावे. अशी माहिती मागितलेली दिसते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 17.12.2009 रोजी कालबध्द पदोन्नती बाबत सन 1994 ते 1998 पर्यंतचे एकुण 5 वर्षाची प्रतिकुल शेरेची माहिती मागणी केलेली आहे. माहिती अप्राप्त आहे प्राप्त होताच आपणास कळविण्यात येईल असे अपीलकर्ता यांना कळविलेले दिसून येते. परंतू त्यानंतर काहीही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून

अपीलकर्ता यांनी दि. 20.2.2010 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 3.4.2010 रोजी देण्यात आलेला असून प्रतिकुल शेरेची माहिती हि जनहितार्थ नाही. मुद्या क्र. 4 व 5 हया सेवा विषयक बाबी प्रश्नार्थक स्वरुपाचे आहे व प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती देण्याबाबत तरतुद नाही व या कारणास्तव सदरचे अपील खारीज करण्यात आलेले आहे. व त्यामुळे समाधान न झाल्याने अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की त्यांना आतापर्यंत कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध झालेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांच्या प्रतिकुल शे–याच्या बाबत आस्थापना शाखेस पत्र देवून माहिती मागितली होती परंतू त्यांनी ती दिलेली नाही. व त्यानंतर केंद्रीय माहिती आयोगाने गोपनिय अहवाल उपलब्ध करुन देता येणार नाही असा निर्णय दिलेला असल्यामुळे त्यांना ती माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा तशाच प्रकारचा निर्णय दिला व इतर दोन मुद्याच्या संदर्भामध्ये प्रश्नार्थक माहिती मागितलेली असल्यामुळे ती उपलब्ध करुन देता येणार नाही असा निर्णय देवून अपील खारीज करण्यात आले असे सांगितले. अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितली ती प्रतिकुल शे–याच्या संदर्भात मागितलेली आहे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे आता पर्यंत गोपनिय अहवाल हे कळविण्यात आलेले नाही. गोपनिय अहवाल हे कळविणे बंधनकारक असते व त्यांना केंद्रीय माहिती आयोगाचा जो निर्णय आहे तो लागू होत नाही तसेच राज्य माहिती आयोगावर सुध्दा बंधनकारक नाही. त्यामुळे माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ करण्यासच त्याचा उपयोग केला गेला आहे असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. प्रश्नार्थक माहिती मागितलेली असल्यामुळे ती अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे ती उपलब्ध करुन देता येत नाही असा जो निष्कर्ष काढलेला आहे तो सुध्दा माहिती उपलब्ध करुन न देण्याचाच प्रकार आहे. ज्या प्रश्नांमधून जन माहिती अधिकारी यांचे मत मागितले असेल ते उपलब्ध करुन देता येणार नाही परंतू ज्या प्रश्नांमधून पांढ–या कागदावर कार्यवाही केली असेल असे निष्पन्न होत असेल तर त्या टिप्पणीची प्रत उपलब्ध करुन देणे अपेक्षित असते. निव्वळ प्रश्नचिन्ह आहे या कारणास्तव काहीही आकलन करुन न घेता माहितीचा अर्ज फेटाळणे हे माहिती उपलब्ध करुन न देण्याचे लक्षण आहे. व त्यामुळे ज्या आस्थापना शाखेनी माहिती अधिकारी यांच्या दि. 26. 11.2009 च्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिली नाही त्यांना अधिनियमाच्या कलम 5 (4) व (5) प्रमाणे जन माहिती अधिकारी समजून त्यांचे विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करणे आवश्यक आहे. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

# आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत सन 1994 ते 1998 पर्यंतचे गोपनिय अहवालातील शेरे हे विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावे. तसेच विभागीय पदोन्नती समितीकडे जो प्रस्ताव पाठविण्यात आलेला असेल त्या प्रस्तावाची प्रत विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावे.

2) जन माहिती अधिकारी यांनी दि. 26.11.2009 च्या अर्जाप्रमाणे आस्थापना कक्ष शिली कक्ष नागपूर वन विभाग यांनी माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (2) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येते. म्हणजे भविष्यात येणा–या अर्जाच्या संदर्भात 30 दिवसाचे आत माहिती उपलब्ध करुन देण्याची जाणीव त्यांना होईल. सदरची शिस्तभंगाची कार्यवाही ही सक्षम अधिकारी यांनी करावयाची आहे.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.839-841

जा.क्र.––––––––– दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 994/2010**

श्री जगदीश हरीचंद्र गेडाम
टिळक वार्ड मंगळवारी रामटेक
ता. रामटेक जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री एच. एल. उम्बरकर
प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त(मुख्यालय)
पोलीस आयुक्त कार्यालय, नागपूर शहर
ता. जि. नागपूर
2) श्री बी. व्ही. चौधरी
जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त(प्रशासन)
पोलीस आयुक्त कार्यालय, नागपूर शहर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 10.8.2010 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 12.7.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 20.7.2010 रोजी नोटीस काढून दि. 10.8.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 2.3.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा पोलीस आयुक्त कार्यालय यांचेकडे अर्जदार जगदीश हरीचंद्र गेडाम यांनी डब्लू पी सी द्वारका गोंपालसिंग धुर्वे रा. धानुटावा जिल्हा गोंदिया हिचे विरुध्द दि. 30.1.2010 रोजी दिलेल्या लेखी तक्रारीवर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल व्यक्तिशः मागितलेला दिसून येतो. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांचा अर्ज हा पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण यांचेशी संबंधित असल्यामुळे मुळ प्रती चौकशी कामी त्यांचेकडे दि. 3.2.1010 च्या पत्रान्वये पाठविण्यात आल्या आहेत त्यामुळे त्यांचेकडून माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे अपीलकर्ता यांना दि.6.3.10 च्या पत्रान्वये कळविण्यात आले. परंतू अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध न झाल्यामुळे त्यांनी दि. 12.3.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 6.4.2010 रोजी देण्यात आलेला असून माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी रामटेक त्यांचेकडून माहिती प्राप्त करुन घ्यावी असा निर्णय देवून अपील निकाली काढण्यात आलेले दिसून येते. त्यानंतर अपीलकर्ता यांना दि. 20.6.2010 रोजी उपविभागीय पोलीस अधिकारी रामटेक यांचे अहवालाची प्रत प्राप्त झाली व त्यामध्ये सदर अर्जातील मजकूर नागूपर शहर येथील असल्याने मा. पोलीस आयुक्त नागूपर शहर यांचे मार्फतीने करण्यात यावे असे ठाणेदार यांनी आपल्या अहवालात नमूद केले आहे असे अहवालात म्हटलेले आहे. परंतू त्या अहवालामध्ये चौकशी करण्यात

आलेली आहे व चौकशी अंती असे निष्पन्न झाले की फॅमिली कोर्टात केस टाकण्यात आलेली आहे व त्यामुळे तसा अहवाल देण्यात आलेला आहे. परंतू तो मान्य न झाल्यामुळे व माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून या कारणास्तव अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांच्या तक्रारीवर चौकशी करण्यात आलेली नाही व माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही. परंतू अपीलकर्ता यांच्या अर्जातील घटना बघितल्यास रामटेक येथील त्यांचे घरातच ती घटना घडलेली आहे व त्यामुळे रामटेक येथील ठाणेदार यांनीच चौकशी केलेली आहे. मात्र अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की सदर महिला पोलीस कॉन्स्टेबल विरुध्द कार्यवाही करण्यात यावी. परंतू माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे कार्यवाही करुन मिळत नाही तसेच पोलीस भरतीच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांची सदरच्या महिला पोलीस भरती संबंधी कार्यवाही करण्याची जी अपेक्षा आहे ती भांडणाशी संबंधित नाही. व त्यामुळे तशी कारवाई करता येणार नाही असे आयोगापुढे व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा सांगितले व त्यामुळे रामटेक येथील ठाणेदार यांनी अर्जाची चौकशी करुन अहवाल दिलेला असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.843-844

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 1010/2010**

श्री प्रभूलाल छोटेलाल लिल्हारे
मु. पो. मुर्दाडा
ता. जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री पी. पी. गोगुलवार
प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंड विकास अधिकारी
पंचायत समिती गोंदिया
ता. जि. गोंदिया
2) श्री एम. एस. बाळणे
जन माहिती अधिकारी तथा सचिव
ग्रामपंचायत मुर्दाडा
ता. जि. गोंदिया ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 11.8.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 12.7.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 20.7.2010 रोजी नोटीस काढून दि. 11.8.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 30.3.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा सचिव ग्रामपंचायत मुर्दाडा यांचेकडे घर क्र. 244 चा संबंध गावठाण प्लॉट क्र. 204, 205 च्या संबधाबाबत पाठपुरावा देणे अशी माहिती व्यक्तिशः मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने दि. 29.4.2010 रोजी माहिती उपलब्ध करुन दिली. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. 5.5.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दि. 31.5.2010 रोजी निर्णय दिला असून जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिल्याचे मान्य करुन अपीलकर्ता यांना अपेक्षित असलेली माहिती देता येणार नाही असा निर्णय देवून अपील अमान्य करण्यात आलेले आहे. परंतू अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की घर क्र. 244 च्या घरमालकानी गावठाण प्लॉट क्र. 204, 205 वर अतिक्रमण करुन घर बांधलेले आहे व त्याबाबतची माहिती मागितली होती. परंतू जन माहिती अधिकारी यांनी नमूना नं. 8 ची

माहिती दिली. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की प्लॉट क्र. 204, 205 आहे किंवा नाही ही माहिती ग्रामपंचायतीत नसून घर नं. 244, 245 आहे व ती माहिती त्याना देण्यात आलेली आहे. प्लॉट नंबरची माहिती त्यांना जिल्हा भूमी अभिलेख कार्यालयामधून मिळू शकेल असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. अपीलकर्ता यांची तक्रार ही अतिक्रमणाच्या संदर्भात आहे व त्याबाबत त्यांना ग्रामपंचायत अधिनियमा प्रमाणे किंवा महाराष्ट्र लॅन्ड रेव्हेन्यू कोड प्रमाणे सक्षम अधिका-याकडे करता येईल व ती त्यांनी केलेली असून त्याबाबतची चौकशी सुध्दा झाली आहे व पुन्हा चौकशीची तारीख मिळालेली आहे असे त्यांनीच सांगितले. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे कोणत्याही प्रकरणात गुणवत्तेच्या बाबत चौकशी करता येत नाही व कारवाई करता येत नसल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.844-845

जा.क्र.———————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 1011/2010

श्री विजय उमराव डोंगरे उर्फ डोंगरवार
वार्ड क्रमांक 3 (पंचशील झेंडा चौक)
मु. पो. कटंगीकला ता. जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री पी. पी. गोगुलवार
प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंड विकास अधिकारी
पंचायत समिती गोंदिया
ता. जि. गोंदिया
2) श्री ए. सी. राणे
जन माहिती अधिकारी तथा ग्राम विस्तार अधिकारी
ग्रामपंचायत कटंगीकला
ता. जि. गोंदिया ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 11.8.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 15.7.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 20.7.2010 रोजी नोटीस काढून दि. 11.8.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 15.1.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा ग्राम विस्तार अधिकारी ग्रामपंचायत कटंगीकला यांचेकडे परिपत्रके, अधिनियम, ग्रामसभेचे अहवाल, ग्रामसभेचे वार्षिक नियोजन वेळापत्रक पुरविण्याबाबत माहिती मागितलेली दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी दि.11.2.2010 च्या पत्रान्वये अपीलकर्त्यास माहिती पुरविलेली दिसते. परंतू अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. 2.3.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि. 20.4.2010 रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मान्य करण्यात आले आहे. व जन माहिती अधिकारी यांनी अतिआवश्यक परिपत्रके जि.प. गोंदियाकडून प्राप्त करुन त्याच्या प्रति अपिलकर्त्यास पुरविण्यात याव्या असा निर्णय दिलेला दिसून येतो. व त्यानंतर त्यांना महिला ग्रामसभेच्या संदर्भातील परिपत्रक उपलब्ध झाले नाही या कारणास्तव राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की महिला ग्रामसभेचे परिपत्रकाची प्रत उपलब्ध झाली नाही तसेच ग्रामसभेचे अहवाल पंचायत समितीकडून पाठविण्यात आले किंवा नाही याबद्यलची माहिती उपलब्ध झाली नाही. व सन 2007–08 व 2008–09 चे वार्षिक ग्रामसभेचे अहवाल पंचायत समितीकडून पाठविण्यात आलले नाही हे त्यांना कळविण्यात आलेले आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दिलेला आहे. अपीलकर्ता यांना माहिती मिळालेली आहे. परंतू महिला ग्रामसभेचे परिपत्रक मिळालेले नाही. ते वास्तविक खंड विकास अधिकारी यांनी प्रथम अपीलाच्या सुनावणीचे वेळेस त्यांचे कार्यालयात जरी उपलब्ध असते तरी माहिती उपलब्ध करुन देणे योग्य झाले असते. परंतू जिल्हा परिषदे कडून उपलब्ध करुन द्यावे असा आदेश देण्याची आवश्यकता नव्हती. व त्यामुळे हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आत प्रथम अपीलाची पुन्हा सुनावणी घेवून अपीलकर्ता यांना महिला ग्रामसभेच्या परिपत्रकाच्या संदर्भात माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून प्रथम अपीलीय अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आत प्रथम अपीलाची पुन्हा सुनावणी घेवून अपीलकर्ता यांना त्याच वेळेस महिला ग्रामसभेच्या परिपत्रकाची प्रत उपलब्ध करुन द्यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.847-848

जा.क्र.––––––––– दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 1009/2010**

श्री रोशन खुशाल बडोले
रा. बौध्दनगर
पो. ता. सडक/अर्जुनी जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य कार्यपालन अधिकारी
जिल्हा परिषद गोंदिया
ता. जि. गोंदिया
2) श्री डी. एस. लोहबरे
जन माहिती अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद गोंदिया
ता. जि. गोंदिया ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 11.8.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 31.5.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 20.7.2010 रोजी नोटीस काढून दि. 11.8.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 5.3.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी यांचेकडे 1) राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य मिशन अभियान अंतर्गत गोंदिया जिल्हयातील जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या कार्यक्षेत्रात येणा-या सर्व उपकेंद्र, प्रा.आ. केंद्र, प्रा.आ.पथक यांना रुग्ण कल्यान निधी, वार्षीक देखभाल समिती, अबंधीत निधी अंतर्गत सन 2008-09 व 2009-10 अंतर्गत मिळालेले अनुदान किती? 2) सन 2008-09 व 2009-10 या वर्षात वरील योजनांवर झालेला खर्च किती? व तो कोणकोणत्या बाबीवर करण्यात आला? 3) 50,000 रु. पेक्षा जास्त रकमेचे काम कोणतया एजंसीला देण्यात आले? अशी माहिती टपालाद्वारे घेणार असे नमूद करुन मागितलेली आहे व दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र जोडलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 6.4.2010 रोजी यु.पी.सी.ने माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतू अपीलकर्ता यांना माहिती मिळाली नाही या कारणास्तव दि. 17.4.2010 रोजी

प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या संदर्भात सुनावणी, निर्णय वगैरे काहीही झाले नसून विचारलेली माहिती मुदतीच्या आत पाठविण्यात आली असे अपीलकर्ता यांना कळविण्यात आले. व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की त्यांनी प्रथम अपील दाखल केल्यानंतरच पत्र मिळाले परंतू त्यात माहिती नाही. व माहिती पाठविल्याचे नमूद केले आहे परंतू माहिती त्यांना उपलब्ध झालेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी माहिती पाठविल्याचे पत्र दाखल केले व जावक नोंदवहीतील नोंद आयोगाचे निदर्शनास आणले परंतू पाठविलेली माहिती अपीलकर्ता यांच्या अर्जातील मुद्दा क्र.3 ची माहिती दिसून येत नाही व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 5.3.2010 च्या अर्जातील मुद्दा क्र.3 ची माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी. तसे न केल्यास जन माहिती अधिकारी शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.850-851

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 1019/2010

श्री गंगाधर रामचंद्रराव कैकाडे
द्वारा रा.ज.कैकाडे माजी नगरसेवक,
पारडी भंडारा रोड यशोदा निवास
भांडेवाडी(बी.ओ.) नागपूर
ता. जि. नागपूर 440035 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक
सहकारी संस्था नागपूर
हिंदुस्थान कॉलनी, अमरावती रोड, नागपूर
2) श्री दाभेराव
जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक
सहकारी संस्था नागपूर शहर 1,
185 आयुर्वेदिक लेआऊट भांडे प्लॉट चौक
उमरेड रोड नागपूर. ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 12.8.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 19.7.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 21.7.2010 रोजी नोटीस काढून दि. 12.8.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 30.4.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था नागपूर यांचेकडे ग्राम सहकारी स्टोअर्स लि. पारडी र.नं.557 भंडारा रोड नागपूर हया ग्राहक संस्थे विषयी एकुण चार मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 31.5.2010 रोजी उपलब्ध माहितीच्या करीता रु. 30/– चा भरणा करावा व त्या संदर्भात दि. 6.5.2010 चे पत्राचा संदर्भ दिलेला आहे. परंतू ते पत्र मिळाले नाही असा आक्षेप अपीलकर्ता यांनी घेतलेला आहे. व त्याप्रमाणे रु. 30/– ची मनिऑर्डर पाठविली होती परंतू ती मनिऑर्डर परत आली व माहिती सुध्दा प्राप्त झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 4.6.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या संदर्भात माहिती प्राप्त झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की त्यांना दि. 6.5.2010 चे पत्र प्राप्त झाले नाही व मनिऑर्डर सुध्दा परत आलेली आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की सदरच्या संस्थेची कोणतीही माहिती त्यांचेकडे उपलब्ध नव्हती किंवा संस्था सुध्दा कोणतीही माहिती त्यांचेकडे पाठवित नव्हते. मात्र अंकेक्षण टिप्पणी उपलब्ध होती व ती 15 पृष्ठांमध्ये उपलब्ध असल्यामुळे त्यांना रु. 30/- चा भरणा करण्यास सांगितले. व त्यानुसारही त्यांना दि. 4.6.2010 रोजी अंकेक्षण टिप्पणी विनामुल्य पाठविण्यात आलेली आहे. परंतू तीही प्राप्त झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी सांगितले. सदरच्या संस्थेच्या संदर्भामध्ये मा. उच्च न्यायालयानी आदेश करुन सर्व कागदपत्रे सादर करण्याचे आदेश दिलेले असल्यामुळे ते उपलब्ध झालेले नाही व ही सर्व माहिती आता त्यांचे कार्यालयात उपलब्ध आहे. सदरची संस्था ही अवसायानात काढण्यात आलेली आहे. त्यामध्येही माहिती ही संस्थेची असल्याने 1990 पासून 2009 पर्यंत माहिती मागितली असल्यामुळे सदरच्या माहितीस उपलब्ध करुन देण्या करीता अतिरिक्त खर्च हा मोठया प्रमाणात येईल व त्यामुळे खर्चाचा भरणा केल्यास त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल. त्यावर अपीलकर्ता यांनी खर्चाचा भरणा करण्यास मान्यता दिली. व त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी पृष्ठ संख्या व प्रती प्रत 2 रु. प्रमाणे खर्चाचे विवरण त्यांना कळवावे व त्याप्रमाणे खर्चाचा भरणा केल्यानंतर छायांकित प्रती तयार करुन माहिती उपलब्ध करुन द्यावी. सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**

Ageyord6.853-854

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 1018/2010**

श्री रत्नशील सी. फुले
प्लॉट नं. 48 गुरुनानकपूरा, नागपूर
ता. जि. नागपूर 440017 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री आर. डी. जवळेकर
प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपआयुक्त(आस्था)
विभागीय आयुक्त कार्यालय नागपूर
ता. जि. नागपूर
2) जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी(प्र.)
विकास शाखा, आस्थापना विभाग,
विभागीय आयुक्त कार्यालय नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 12.8.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 15.7.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 21.7.2010 रोजी नोटीस काढून दि. 12.8.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 8.1.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी(प्र.) विकास शाखा, आस्थापना विभाग, विभागीय आयुक्त कार्यालय नागपूर यांचेकडे शासनास विभागीय आयुक्त कार्यालयाने पाठविलेले पत्र क्र. विकास/डेस्क 10(7)/कावि/335/97 आयुक्तांचे कार्यालय नागपूर विभाग नागपूर दि. 26.2.1997 ची प्रत पाहिजे अशी माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने दि. 16.1.2010 रोजी माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी यांनी 12 वर्षा पुर्वीची जुनी माहिती असल्यामुळे प्रकरणाचा शोध घेण्याचे काम सुरु आहे व उपलब्ध होताच माहिती पुरविण्यात येईल असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर पुन्हा दि. 10.2.2010 रोजी मागितलेली माहिती फार जुनी (12 वर्षा पुर्वीची असल्याने) सदरची माहिती नष्ट झाल्याचे नाकारता येत नाही तरी सुध्दा कार्यालयात उपलब्ध लेखा वरुन शोध घेण्यात आला परंतू प्रकरण उपलब्ध झालेले नाही. त्यामुळे आपण मागितलेली माहिती आपणास पुरविता येणे शक्य नाही असे कळविलेले दिसते. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 23.2.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 20.3.2010 रोजी देण्यात आलेला असून प्रस्तूत प्रकरणाशी संबंधीत असलेल्या दस्तऐवजाच्या प्रती या कार्यालयास 10 दिवसाचे आत उपलब्ध करुन द्यावे. अपीलार्थी यांचेकडून मागणी केलेले दस्तऐवज या कार्यालयास प्राप्त होताच शासनाकडून पाठपुरावा करण्यात येईल असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतू त्यानंतर माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की 1997 मध्ये शासनाकडे पत्र किंवा अपील पाठविण्यात आले होते व त्याबद्यलचा निर्णय आतापर्यंत शासनाकडून प्राप्त झालेला नाही व त्यामुळेच सदरच्या पत्राची सत्यप्रत मागितलेली होती. त्यावर प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपआयुक्त यांनी आयोगापुढे असे सांगितले की 12 वर्षा पुर्वीची जुनी माहिती असल्यामुळे ती नष्ट करण्याचीच जास्त शक्यता आहे. परंतू अपीलकर्ता यांचेकडे त्या पत्राची प्रत उपलब्ध होती व त्याप्रमाणे शासनाकडे पाठपुरावा करण्यात आला व त्यातून शासनाकडून त्यांचे अपील हे खारीज करण्यात आलेले आहे. कार्यालयात माहिती उपलब्ध करण्याच्या शक्यतेच्या संदर्भात पुन्हा चौकशी केली श्री रत्नशील सी. फुले यांनी शासनाकडे दाखल केल्याचा अपील अर्ज मुख्य कार्यपालन अधिकारी जिल्हा परिषद चंद्रपूर यांचे मार्फत सादर केला. सदर अर्ज मुख्य कार्यपालन अधिकारी जिल्हा परिषद चंद्रपूर यांचे पत्र दि. 19.8.1996 अन्वये या कार्यालयात प्राप्त झाले असून सदर अपील अर्ज आवश्यक दस्तऐवजासह या कार्यालयाचे पत्र दि. 26.2.1997 अन्वये शासनास सादर करण्यात आला. या प्रकरणा संबंधी नस्ती हाताळणारे तत्कालीन लिपीक यांचे आकस्मिक मृत्यु झाल्याने त्यांचेकडील प्रभार पंचनामा करुन प्रकरणाची यादीसह कार्यरत लिपीकाकडे सोपविण्यात आलेले आहे. त्या यादीत सदर प्रकरणातील नस्ती समावेश नाही. परंतू उपआयुक्त यांनी न्याय करण्याच्या दृष्टीने संबंधित प्रकरणाचा पाठपुरावा करुन अपीलकर्ता यांना शासनाकडून निर्णय प्राप्त करुन दिला आहे. त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.856-857

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 1041/2010**

श्री पंकज सुरेश गुप्ता
संत्रा मार्केट, कृष्णा टॉकीज समोर,
राधे सदन नागपूर व
ता. जि. नागपूर 18 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री प्रदिप डांगे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा अति.जिल्हाधिकारी
जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्री संजय गंथडे
जन माहिती अधिकारी तथा प्रभारी अधिकारी,
सेतू केंन्द्र, जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 13.8.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 21.7.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 26.7.2010 रोजी नोटीस काढून दि. 13.8.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 22.4.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा सेतू केंन्द्र, जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर यांचेकडे मुनेश्वर शाहू यांनी जातीच्या प्रमाणपत्राकरीता कागदपत्रे दि. 20.10.2006 रोजी दाखल केली ती कागदपत्रे उपलब्ध करुन टपालाद्वारे द्यावे अशी माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने दि. 7.5.2010 रोजी मुळ प्रकरणाचा शोध घेणे सुरु आहे. प्रकरण प्राप्त होताच आपण मागणी केलेल्या कागदपत्रांच्या प्रती तात्काळ उपलब्ध करुन देण्यात येईल असे कळविलेले दिसून येते. परंतू माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 4.6.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 23.6.2010 रोजी देण्यात आलेला असून 15 दिवसाचे आंत माहिती उपलब्ध करुन द्यावी असे नमूद केले. परंतू माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की आतापर्यंत त्यांना माहिती उपलब्ध झालेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की कार्यालयाचे स्थलांतर झाल्यामुळे अभिलेखे इतस्ततः झालेले आहेत व त्यामुळे शोध घेणे सुरु आहे व आता पुन्हा विद्यार्थ्यांची जातीच्या प्रमाणपत्राकरीता भरपूर मागणी सुरु असल्यामुळे शोध घेण्यास विलंब होत आहे. परंतू असे असले तरी माहिती ही 2006 ची म्हणजे फार जुनी आहे ती उपलब्ध होणे आवश्यक आहे. परंतू त्याकरीता प्रथम अपीलीय अधिकारी यांनी नायब तहसिलदार यांची माहितीचा शोध घेण्यासाठी नियुक्ती करावी व नायब तहसिलदार यांनी 15 दिवसामध्ये माहितीचा शोध घेवून माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून प्रथम अपीलीय अधिकारी यांनी माहितीचा शोध घेण्यासाठी नायब तहसिलदार यांची नियुक्ती करावी व नियुक्ती झाल्यानंतर तहसिलदार यांनी 15 दिवसामध्ये माहितीचा कसून शोध घेवून उपलब्ध माहिती अपीलकर्ता यांना विनामुल्य पुरवावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.859-860

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 1039/2010**

श्री वामन निळकंठ देशपांडे
एम.आय.जी. 24/4,
भामटी परसोडी हाऊसिंग बोर्ड कॉलनी,
त्रिमुर्ती नगर रिंग रोड नागपूर 22 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य अधिकारी
नागपूर गृह निर्माण व क्षेत्रविकास मंडळ नागपूर
सिव्हील लाईन, नागपूर
2) जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता
नागपूर गृह निर्माण व क्षेत्रविकास मंडळ नागपूर
सिव्हील लाईन, नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 13.8.2010 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 13.7.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 26.7.2010 रोजी नोटीस काढून दि. 13.8.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 25.3.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा नागपूर गृह निर्माण व क्षेत्रविकास मंडळ नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार कायद्यातील कलम 4(1) (ग) व (घ) प्रमाणे गाळयांच्या किमती निर्धारण करतांना कोणत्या वस्तुस्थितीचा विचार करुन पध्दत ठरविली. व विसंगतीची माहिती द्यावी अशी माहिती मागून पुन्हा 4 मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 11.6.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता यांनी मुद्येनिहाय उत्तर दिलेले दिसून येते. परंतू अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. 3.5.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.8.6.2010 रोजी कळविलेला दिसतो. परंतू त्यामुळे समाधान न झाल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि. 3.6.2010 रोजी सुनावणी घेतली व काही माहितीच्या संदर्भामध्ये माहिती उपलब्ध करुन देता येईल असे आदेश दिले. परंतू माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे ती 1982 च्या प्रकल्पाची आहे. परंतू माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 2 (1) प्रमाणे 'माहिती' या संज्ञेची व्याख्या केली आहे. त्या व्याख्ये प्रमाणे सार्वजनिक प्राधिकरणामध्ये ज्या साहित्याच्या स्वरुपात उदा. कागदपत्रे, अभिलेखे, टिपण्या, शासन निर्णय, परिपत्रके, इत्यादीच्या स्वरुपात जी माहिती उपलब्ध असेल त्याच्या छायांकित प्रती देणे असा ''माहितीचा अधिकार'' या संज्ञेची व्याख्या आहे. व त्यामुळे कोणत्याही प्रकरणात निर्णय प्रक्रियेच्या संदर्भामध्ये जन माहिती अधिकारी यांचे अभिप्राय किंवा मत मागता येत नाही. अर्जदाराने कागदपत्राच्या स्वरुपात माहिती उपलब्ध करुन घेणे व त्यातून निर्णय प्रक्रिये संबंधी आक्षेप असल्यास त्या त्या कायद्या प्रमाणे सक्षम अधिका–याकडे तक्रार करणे अपेक्षित असते व त्यामुळे अपीलकर्ता यांनी त्यांचा जो प्रकल्प आहे त्या प्रकल्पाच्या संदर्भात संपूर्ण माहिती ही मुख्य अभियंता यांचे कार्यालयात उपलब्ध असल्यास त्यांचेकडून उपलब्ध करुन घेवून व त्यातून त्यांना जे प्रश्न आहे त्या प्रश्नाच्या संदर्भामध्ये सक्षम अधिका–याकडे तक्रार करणे संयुक्तिक राहिल किंवा न्यायालयात तक्रार करता येईल. त्यामुळे अर्जच मुळात हा अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे नसल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.862-863

जा.क्र.––––––––– दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 1118/2010, अपील क्रमांक नाग 1119/2010 व अपील क्रमांक नाग 1120/2010.**

श्री विजय शंकरराव आंभोरे
51 बी, पांडे ले आऊट, खामला, नागपूर
ता. जि. नागपूर 25 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता
नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर
सदर, नागपूर
2) श्री एस. यु. देव
जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता(नि.)
नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर
सदर, नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 16.8.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 21.7.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये तीन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 29.7.2010 रोजी नोटीस काढून दि. 16.8.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी वरील सर्व अपीलांमध्ये दि. 11.5.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांचेकडे श्री महेशकुमार पांडे यांच्या इमारतीचा नकाशा मंजुर केला असता कार्यकारी अभियंता नागपूर सुधार प्रन्यास (मु.) यांना दि. 4.1.2006 रोजी इमारत नकाशा नामंजुर करण्याचा अधिकार आहे काय? कोणत्या अधिकारानुसार दि. 4.1.2006 रोजी इमारत नकाशा जवळपास 42 महिन्यानंतर नामंजुर करण्यात आला त्याची माहिती द्यावी. माहितीचा कालावधी दि. 14.10.1997 ते आजपावेतो असा आहे. तसेच मौजा खामला नगर भुमापन क्रमांक 2043/2 रोजी इमारत नकाशा परमिट क्रमांक सी.एस./4722/19783 दि. 14.10.1997 नुसार मंजुर केले असून त्या जागेचे एकूण क्षेत्रफळ 9048 चौ.मीटर असल्याचे दिसून येते. ज्या जागेचा इमारत नकाशा मंजूर करताना नियोजन प्राधिकरणाची परवानगी होती काय? परवानगी नसल्यास नियमाप्रमाणे 15 टक्के खुली जागा सोडली होती काय? व पुन्हा श्री महेशकुमार पांडे यांच्या संदर्भामध्ये त्यांच्या जागेच्या संदर्भामध्ये माहिती मागितलेली

दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना अनुक्रमे दि. 28.5.2010 रोजी माहिती उपलब्ध करुन देतांना रु.4/– व रु.6/– चा भरणा करावा असे कळविलेले दिसून येते. तसेच प्रत्यक्षात पाहणी करण्यास उपस्थित व्हावे असेही कळविलेले दिसून येते. परंतू अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. 8.6.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 25.6.2010 व दि. 3.7.2010 रोजी देण्यात आलेला असून दोन अपीलांमध्ये म्हणजे अपील क्र. 1118 नाग/2010 व क्र. 1120 नाग/2010 मध्ये धारीकेचे अवलोकन करावे व जन माहिती अधिकारी यांनी मुळ अर्जात मागितलेले दस्तऐवज विनामुल्य उपलब्ध करुन द्यावेत व एका अपीलामध्ये म्हणजे अपील क्र. 1119 नाग/2010 मध्ये माहिती उपलब्ध झाली या कारणास्तव प्रथम अपील खारीज करण्यात आले आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे तीन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. तीनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज घेण्यात आली त्यात अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी यांनी आयोगास सांगितले की अपीलकर्ता यांनी धारीकेचे निरीक्षण करावे व त्यानंतर त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्यास तयार आहे. परंतू ते धारीकेचे निरीक्षण करावयास येत नाही. प्रथम अपीलाचा निर्णय योग्य असल्यामुळे सदरची तीनही अपीले खारीज करण्यास पात्र आहेत.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक नाग 1118/2010, अपील क्रमांक नाग 1119/2010 व अपील क्रमांक नाग 1120/2010 ही अपीले खारीज करण्यात येतात.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.865-866

जा.क्र.———————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 1059/2010

श्री ओमकारेश्वर शंकरराव बडवाईक
तिलक वार्ड मोहाडी
ता. मोहाडी जि. भंडारा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री म. आ. माटे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता/परिमंडलीय अधिकारी
दक्षता पथक, पाटबंधारे विभाग, नागपूर
सिव्हील लाईन, नागपूर
2) श्री धापोडकर
जन माहिती अधिकारी तथा
दक्षता पथक, पाटबंधारे विभाग, नागपूर
सिव्हील लाईन, नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 16.8.2010 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 27.7.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 29.7.2010 रोजी नोटीस काढून दि. 16.8.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 25.2.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक अभियंता/परिमंडलीय अधिकारी यांचेकडे सन 2008 मधील गट 'क' संवर्गातील पद सहा. भांडारपाल सरळसेवा भरतीने भरावयाच्या पदाची माहिती अशी माहिती व्यक्तिशः मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने दि. 19.3.2010 रोजी 31 प्रतीचे रु. 62/- चा भरणा करावा असे कळविले व अपीलकर्ता यांनी दि. 3.4.2010 रोजी अतिरिक्त रकमेचा भरणा केल्यानंतर त्यांना त्याच दिवशी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतू समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 25.4.2010 रोजी प्रथम अपील प्रथम दाखल केले. प्रथम अपीलाच्या संदर्भात दि. 18.5.2010 रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिली तसेच एकुण आठ अधिक्षक अभियंता यांना उर्वरीत माहिती उपलब्ध करुन द्यावी असे कळविले. व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना दि. 26.5.2010,

दि. 9.6.2010, दि. 8.6.2010, दि. 7.6.2010, दि. 3.6.2010, दि. 4.6.2010 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असली तरी त्यांनी दि. 26.7.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. द्वितीय अपील मेमोमध्ये जी माहिती त्यांनी मागितलेली आहे ती सुध्दा त्यांना उपलब्ध करुन दिलेली आहे असे उत्तरवादी यांनी सांगितले. यावरुन अपीलकर्ता यांना ती माहिती उपलब्ध झालेली असावी तसेच अपीलकर्ता यांना त्यांची नियुक्ती करावी अशी त्यांची अपेक्षा असल्यामुळे त्यांनी ही सर्व माहिती मागितलेली दिसून येते. व त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.868-869

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 1060/2010**

श्रीमती पंचफूला सहदेवराव वानखेडे
तर्फे मुख्त्यार–श्री प्रकाश किसन मोटघरे
रा.54 भिमनगर, गल्ली नं.5, रामेश्वरी रोड
पो. भगवान नगर नागपूर 440027 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता
नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर
सदर, नागपूर
2) श्री एस. यु. देव
जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता(नियमितीकरण)
नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर
सदर, नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 16.8.2010 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 27.7.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 29.7.2010 रोजी नोटीस काढून दि. 16.8.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 19.5.2010 रोजी जन माहिती अधिकारी कार्यकारी अभियंता नागपूर सुधार प्रन्यास यांचेकडे दि. 1.4.2010 रोजी केलेल्या अर्जावर आजपर्यंत कोणतीच कार्यवाही का करण्यात आली नाही. अर्ज केल्यानंतर कार्यवाही करीता किती कालावधी लागतो? अशी माहिती व्यक्तिशः मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 19.6.2010 रोजी आपण विचारलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची आहे. माहितीच्या अधिकारा अंतर्गत अभिलेख स्वरुपात उपलब्ध माहिती उचित शुल्क आकारुन देता येईल असे कळविलेले दिसून येते. व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 21.6.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 9.7.2010 रोजी देण्यात आलेला असून अपीलार्थी यांनी अर्जाद्वारे प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती विचारलेली आहे त्यांनी त्यांच्या आवेदन पत्रावरील कार्यवाही बाबत इमारत अभियंता (दक्षिण) यांचेकडे वेगळा अर्ज करावा असा निर्णय दिलेला दिसून येतो व प्रथम अपील खारीज करण्यात आलेले आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3 अपीलकर्ता यांचे तर्फे मुख्त्यार–श्री प्रकाश किसन मोटघरे हे हजर झालेले आहेत व त्यांनी युक्तीवाद केला. यांनी असे सांगितले की त्यांच्या दि. 1.4.2010 च्या अर्जावर कोणत्याही प्रकारची कार्यवाही केलेली नसल्यामुळे त्यांनी माहिती मागितली होती. परंतू ती माहिती मिळालेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्ता यांच्या दि. 1.4.2010 च्या अर्जावर कार्यवाही का केली नाही असे त्यांनी विचारलेले आहे व हे प्रश्नार्थक असल्यामुळे त्यास तसे उत्तर

दिलेले आहे. अपीलकर्ता यांचा प्रश्न असला तरी दि. 1.4.2010 च्या अर्जाच्या संदर्भामध्ये कार्यवाहीच्या संदर्भात माहिती उपलब्ध करुन देणे हे अपेक्षित होते. कार्यवाही झालेली असेल तर तशी माहिती द्यावी किंवा कार्यवाही का करण्यात आली नाही याबद्यलची माहिती सुध्दा देणे आवश्यक असते अन्यथा त्यांना माहिती उपलब्ध होवू शकणार नाही व अर्जावर सुध्दा कार्यवाही सार्वजनिक प्राधिकरण करणार नाही. एखाद्या अर्जावरील कार्यवाही ही का करण्यात येत नाही याची कारणे असू शकतात व त्यामुळेच ती उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी जे उत्तर दिलेले आहे ते योग्य नसल्यामुळे त्यांचेविरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे शास्ती लादणे आवश्यक आहे. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत त्यांच्या अर्जाच्या कार्यवाही संबंधाने माहिती व्यक्तीशः उपलब्ध करुन द्यावी. त्याकरीता अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे प्रत्यक्ष संपर्क साधून माहिती उपलब्ध करुन घ्यावी.
2) अपीलकर्ता यांच्या अर्जाच्या संदर्भात योग्य ती माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द शिस्तभंगाच्या कार्यवाहीची शिफारस करण्यात येते. सदरची शिस्तभंगाची कार्यवाही ही **सभापती नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर** यांनी करावयाची आहे.
3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.871-872

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1126 नाग/2010 व**
**अपील क्रमांक 1163 नाग/2010**

श्री इंदरसिंह हि. परिहार
155 हनुमान नगर, सिंधी कॉलनी, पुलगाव
ता. जि. वर्धा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री अजित देशमुख
प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहसंचालक
उच्च शिक्षण(अनुदाने) नागपूर
जूने मॉरिस कॉलेज, सिताबर्डी, नागपूर
2) जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य
सुवालाल पाटनी कॉलेज, पुलगाव
जि. वर्धा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 18.8.2010 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 27.7.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 2.8.2010 रोजी नोटीस काढून दि. 18.8.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी सुवालाल पाटनी कॉलेज, पुलगाव द्वारा मुझे माहिती उपलब्ध करवा दी गई है । व माहिती मुझे मिल गई है । इसलिए मैं स्वच्छापूर्वक मेरा अपिल क. 1126/नाग/2010 तसेच दि. 4.8.2010 रोजी दिलेले अपील परत घेत आहे. असे लेखी दिलेले आहे.

3. परंतू प्राचार्य तथा माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्ता प्राध्यापक आय. एच. परिहार निलंबित प्राध्यापक असून माहिती अधिकारा अंतर्गत ते माहिती मागतांना कशा पध्दतीने कार्यपध्दती अवलंबितात व त्यांचा माहिती पेक्षा त्रास देण्याचा कसा उद्येश आहे याबाबत त्यांनी खालीलप्रमाणे लेखी आयोगाकडे दिलेले आहे.

अपीलकर्ता प्राध्यापक आय. एच. परिहार निलंबित प्राध्यापक हे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे अंतर्गत माहिती मागतांना माहिती अर्जावर जी तारीख टाकतात त्यानंतर काही दिवसांनी अर्ज सादर करतात व आम्हास ज्या तारखेला अर्ज मिळातो तेव्हापासून 30 दिवसाचे आत माहिती दिली असता व हि माहिती डाक बुक द्वारे पाठविली असता माहिती लेट झाली म्हणून घेत नाही व ते माहितीचे पत्र परत घेवून जा असे नेहमी म्हणतात. त्यानंतर रजिस्टर पोस्टाने माहिती पाठविली असता ते रजिस्टर अे. डी. चे माहितीचे पत्र पोष्टमनननी 5 ते 6 वेळा घेवून गेल्यावरही घेत नाही व पोष्टमनला विश्वासात घेवून शेरा लिहण्यास सांगतात की ''प्राप्तकर्ता समय पर घरपर मिलते नही'' असे लिहून पत्र परत पाठवितात. त्यांची झेरॉक्स प्रत सोबत जोडलेली आहे. तसेच शिपाया सोबत डाकबुकवर माहिती पाठविली असता ती घेत नाही. जाणूनबूजून त्रास देण्याच्या उद्येशाने ते वरच्यावर माहितीच्या अधिकाराचे अर्ज देवून त्यावर विहित मुदतीत माहिती दिली तरी ते घेत नाही. व नेहमी खोटया आधारावर ते अपीलीय अधिकारी यांचेकडे खोटी अपील करीत असतात

व त्या अपील अर्जावर निर्णय होण्याच्या आधीच व अपीलाची विहित मूदत संपण्याच्या आधीच राज्य माहिती आयोगाकडे दुसरी अपील करतात जसे अपील क्र. 1126/नाग/2010 सुनावणी दि. 18.8.10 दुस–या अपीलाचे सुनावणीच्या दिवशी ''मला माहिती मिळाली मी अपील परत घेत आहे'' असे लिहून देवून अपील खारीज करण्यात येते. तसेच मा.सहसंचालक व अपीलीय अधिकारी यांनी पत्र क्र. उशीनाग/वेतन अनु/मा.अ/4832/10 दि.9.8.10 च्या पत्रात प्रा. परिहार यांना म्हटले की आपणास सूचीत करण्यात येते की आपण या कार्यालयास माहिती अधिकारात माहिती मागतांना नियमाच्या चाकोरीतून माहिती मागत नाही. असे दिसून येते. उगीच एकाच बाबी वर वारंवार माहिती मागून कार्यालयाचा विनाकारण वेळ खर्ची घालू नये. आपण या कायद्याचे पुस्तक विकत घ्यावे'' हया सर्व बाबीवरुन तसेच राज्य माहिती आयोगाकडे तीनदा अपील अर्ज दाखल करुन त्यांनी आपला अपील अर्ज मागे घेतलेला आहे. हया अनेक कारणांवरुन असे निदर्शनास येते की त्यांना कोणत्याही प्रकारच्या माहितीची आवश्यकता नाही. व दिलेली माहिती ते घेत नाही. केवळ विनाकारण त्रास देण्याच्या उद्येशाने निलंबित प्राध्यापक आय. एच. परिहार हे माहिती अधिकारात माहिती मागत असतात. प्रत्येक महिन्यात अंदाजे 10–15 माहितीचे अधिकारात माहिती मागतात व त्रास देण्याचा प्रयत्न करतात. तरी आपणास नम्र विनंती की प्राध्यापक आय. एच. परिहार निलंबित प्राध्यापक यांना कोणत्याच प्रकारच्या माहितीची आवश्यकता नाही केवळ निलंबित केल्यामुळे विनाकारण त्रास देण्याच्या उद्येशाने व मानसिक छळ करण्याच्या उद्येशाने मानसिक त्रास देण्याच्या उद्येशाने माहिती मागत असतात. व तीनदा आपल्याकडे म्हणजे राज्य माहिती आयोगाकडे अपील करुन ती परत घेतलेली आहे. यावरुन त्यांना माहितीची आवश्यकता नाही असे वाटते. विनाकारण मानसिक त्रास देण्याच्या उद्येशाने, कार्यालयाचा निष्कारण वेळ वाया घालविण्याच्या उद्येशाने ते अपील व अर्ज करीत असतात. कृपया आपण वरील सर्व बाबींचा निर्णय देतांना विचार करावा अशी मा. आयुक्तास विनंती करण्यात येते. अपीलकर्ता हयांना कोठल्याही माहितीची आवश्यकता नसून केवळ संस्थेला मानसिक त्रास देण्याचा हेतू दिसून येतो.

अपील क्रमांक 1126 नाग/2010 व अपील क्रमांक 1163 नाग/2010 ही अपीले खारीज करण्यात येतात.

1) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.879-880

जा.क्र.––––––––– दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1130 नाग/2010**

श्री प्रशांत विठ्ठराव दांडेकर
3/219 एच ब्लॉक, नंदनवन नासुप्र घरकुल योजना,
व्यंकटेश नगर, नागपूर
ता. जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री दिलीप दौलतराव
प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहा. आयुक्त
महानगर पालिका, नेहरु झोन क्र. 5, नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्री रविंद्र गायकवाड
जन माहिती अधिकारी तथा विभागीय अधिकारी
(स्वास्थ विभाग) महानगर पालिका, नेहरु झोन क्र. 5, नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 18.8.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 29.7.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 2.8.2010 रोजी नोटीस काढून दि. 18.8.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 20.3.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा झोनल अधिकारी (स्वास्थ विभाग) महानगर पालिका, नेहरु झोन क्र. 5 यांचेकडे ना.सु.प्र.नी नंदनवन घरकुल योजना व्यंकटेश नगर येथे अल्प उत्पन्न गटासाठी बांधलेल्या 753 गाळयाच्या सफाई बाबत अशी माहिती मागितलेली दिसून येते. माहितीचा कालावधी 1.1.2004 ते 31.3.2010 पर्यंत. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 20.4.2010 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु उपलब्ध करुन दिलेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 10.5.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दि. 5.6.2010 रोजी पूर्ण माहिती देण्यात आलेली नसल्यामुळे पूर्ण माहिती विभागीय अधिकारी (स्वास्थ विभाग) महानगर पालिका, नेहरु नगर झोन क्र. 5 यांनी 15 दिवसाचे आंत आपणास द्यावी असे निर्देश संबंधितांना दिलेले आहेत असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना कळविलेले दिसून येते. त्यानंतर दि. 11.6.2010 रोजी अपीलकर्ता यांना पुन्हा माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतू त्यामध्ये अधिक माहिती हवी असल्यास आपण नेहरु झोन क्र. 5 येथे विभागीय अधिकारी (स्वास्थ विभाग) यांना प्रत्यक्ष भेटून उपलब्ध दस्तऐवजाचे निरीक्षण करुन आवश्यक त्या प्रतीची आपणास पूर्तता करण्यात येईल असे कळविलेले दिसून येते. परंतू अपीलकर्ता यांनी दि. 19.7.2010 रोजी माहिती निरीक्षणाकरीता उपलब्ध करुन दिली नाही व 24 तासाचे आत निरीक्षणाकरीता उपलब्ध करुन देण्यात यावे असे प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहा. आयुक्त यांना पत्र दिलेले दिसून येते. त्याप्रमाणे दि. 27.7.2010 रोजी संपूर्ण सविस्तर माहिती

निरीक्षणाकरीता प्रमाणित करुन उपलब्ध आहे. मुद्या क्र. 1 ते 11 ची माहिती त्यांचेकडे उपलब्ध असलेली माहिती मिळाली असे अपीलकर्ता यांनी पोच दिलेली आहे. तत्पूर्वी दि. 22.7.2010 रोजी प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येतो. व त्यामुळे दि. 27.7.2010 रोजी निरीक्षणाकरीता उपलब्ध करुन दिलेले दिसून येते. आज अपीलकर्ता यांनी प्रतिज्ञापत्र सादर केलेले आहे. व त्या प्रतिज्ञापत्रात मुद्येनिहाय माहितीच्या संदर्भामध्ये प्रत्यक्ष मोका जागेवर वरील जागेवरील वस्तुस्थिती त्यांनी दिलेली आहे. व त्यास अपील दाखल केल्या नंतर खोटी माहिती तयार करुन दिली तसेच दि.27.2.2000 पासून ना.सु.प्र.च्या 7 योजना वगळता उर्वरीत सर्व नागपूर शहरातील नागरी सुविधांची देखभाल व दुरुस्ती महानगर पालिकेने करणे आवश्यक आहे असे प्रतिज्ञापत्रात दिलेले आहे.

4. प्रथम अपीलातील माहितीचे अवलोकन केले असता अपीलकर्ता यांना प्रत्यक्ष मोक्यावर आढळुन आलेली वस्तुस्थिती व उपलब्ध करुन दिलेली माहिती यामध्ये तफावत आहे असे आढळुन येते. परंतू माहिती खोटी दिली त्यास म्हणता येत नाही. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे कार्यालयामध्ये जी माहिती कागदपत्राच्या स्वरुपात उपलब्ध असते तीच माहिती उपलब्ध होते. परंतू या प्रकरणामध्ये अपीलकर्ता यांना प्रत्यक्ष मोक्यावरील कार्यवाहीची अपेक्षा दिसून येते. त्याकरीता अपीलकर्ता यांनी उपलब्ध झालेली माहिती व मोक्यावरील वस्तुस्थिती याबाबत सक्षम अधिकारी यांचेकडे तक्रार करणे संयुक्तीक राहिल. प्रत्यक्ष कार्यवाही करणे हे राज्य माहिती आयोगाच्या अधिकार कक्षेत येत नाही. तर त्या त्या संबंधित सक्षम अधिकारी यांचेकडे अधिकार असल्यामुळे अपीलकर्ता यांनी त्यांचेकडे तक्रार करणे संयुक्तीक राहिल. परंतू अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली तसेच अपीलकर्ता यांनी निरीक्षणाअंती सुध्दा कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती उपलब्ध करुन घेतली व त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.871-872

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1131 नाग/2010**

श्री ॲड. वा. सी. गायकवाड
मु. पो. मनसर
ता. रामटेक जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी
रामटेक
ता. रामटेक जि. नागपूर
2) श्री शिवराम पडोळे
जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार
तहसिल कार्यालय पारशिवनी
ता. पारशिवनी जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 18.8.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 29.7.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 2.8.2010 रोजी नोटीस काढून दि. 18.8.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 26.3.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालयात रे.अ.नं.12/आर.टी.एस.–64/92–93 मौजा बखारी पं.ह.नं.20 तहसिल पारशिवनी जि. नागपूर यांतील निर्णयाची अंमलबजावणी न केल्याबद्यल माहिती मागितलेली दिसून येते. सोबत दर्शविलेले परिशिष्ट अधिक माहितीसाठी पाहावे असे कळविलेले दिसते. त्यामध्ये दिवाणी मुकदमा नं.1264/95 च्या निर्णयाप्रमाणे दानपत्र फेरफार पंजी 105 पुर्ण करण्याचा आदेश व्हावा. निर्णय अंमलात न आणल्यास घडलेल्या कारणाबद्यल माहिती पुरवावी. सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दि. 14.5.2010 रोजी मागितलेली माहिती या कार्यालयात उपलब्ध झालेली असून माहिती आपण कार्यालयाकडून प्राप्त करुन घ्यावी असे कळविलेले दिसून येते. परंतू अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. 10. 6.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. परंतू त्यानंतरही अपीलकर्ता यांच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 15.7.2010 रोजी दि. 14.5.2010 च्या पत्रानुसार माहिती घेवून जाण्याबाबत

कळविण्यात आले होते. परंतू आपण माहिती न नेल्यामुळे प्राप्त झालेली माहिती फेरफार पत्रक प्रत व 7/12 प्रत झेरॉक्स सोबत पाठविण्यात येत आहे असे कळविलेले दिसते. व त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही याकारणास्तव अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता गैरहजर आहे. परंतू जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्ता यांनी आदेशाच्या निरीक्षणाची अंमलबजावणी करण्याच्या संदर्भामध्ये कारवाई करण्याचे अपेक्षिलेले होते ही बाब माहितीच्या अधिकारात येत नाही. फेरफार पंजीच्या संदर्भात ही कारवाई सुरु आहे. त्यांना त्याबाबत माहिती घेवून जाण्यास विहित मुदतीतच कळविण्यात आलेले होते. परंतू माहिती घेवून गेलेले नाही. व आज सुध्दा त्यांना त्याबाबत सांगण्यात आलेले आहे. त्यामुळे कार्यवाही पूर्ण झाल्यावर माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल असे आयोगापुढे सांगितले. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून फेरफार पंजीची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर अपीलकर्ता यांना माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.874-875

जा.क्र.———————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1150 नाग/2010**

श्री राजू शंकरराव निकोसे
मु. पो. सावरी (बिड)
ता. वरोरा (चिमूर) जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्रीमती हेमलता गजभिये
प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्री अनिस करदार
जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 30.8.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 19.7.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 6.8.2010 रोजी नोटीस काढून दि. 30.8.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. राज्य माहिती आयोग कार्यालय, खंडपीठ नागपूर यांचेकडे दि. 24.9.2009, दि. 22.12.2009 रोजी दाखल केलेल्या तक्रारीच्या संदर्भात न्याय मिळाला नाही तसेच दि. 17.7.2008 अपील क्रमांक 1757/2007 या मध्ये सुध्दा न्याय न मिळाल्यामुळे तक्रार दाखल केली होती. तसेच तक्रार अर्ज, अपील निकाली काढावी अशा प्रकारची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 10.3.2010 रोजी यापूर्वी दाखल केलेले द्वितीय अपीले क्रमांक 1757/2007, 294/2008, 106/2008, 224/2008, 427/2008, 656/2009 ही आपणास वेळोवेळी माहिती उपलब्ध करुन देण्यात आल्याने खारीज करण्यात आल्याचा मा. आयोगाने यापुर्वी निर्णय दिले आहेत. यास्तव आपले तक्रारीवर कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही असे कळविलेले दिसून येते. परंतू अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. 15.3.2010 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 18.5.2010 रोजी देण्यात आलेला असून अपील क्रमांक 436/2009 मध्ये मा. आयुक्तांकडे तक्रार क्र.

56/2010 मध्ये सुनावणी झालेली असल्याने त्यासंबंधीचे आदेश निर्गमित करण्यात येतील. दि. 8.7.2008 रोजी दाखल केलेल्या द्वितीय अपीला सोबत प्रपत्र 'ब' नसल्याने हे अपील ग्राहय धरण्यात आले नाही. तसेच जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर योग्य असल्यामुळे प्रथम अपील हे खारीज करण्यात आलेले दिसून येते. परंतू अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांचे सर्व अपीलातील निर्णयाचा विचार करता त्यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे ते खारीज करण्यात आलेले आहे. परंतू खारीज झालेल्या अपीलाच्या संदर्भात सुध्दा त्यांनी न्याय मिळाला नाही अशा तक्रारी केलेल्या आहेत. परंतू अपीलकर्ता यांची अपेक्षा ही की त्यांना तहसिलदार किंवा माहिती अधिकारी यांचेकडून त्यांचे अपेक्षित कार्य करुन मिळावे. थोडक्यात कार्यवाहीची अपेक्षा आहे जी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे अपेक्षित नाही. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे माहितीचा अर्ज ज्या दिवशी केला जातो त्यावेळेस जी वस्तुस्थिती असेल त्याबद्यलची कागदपत्रे जशी आहे तशी किंवा माहिती ही उपलब्ध करुन दिली जाते. कोणत्याही प्रकरणात कार्यवाही करण्याचे आदेश अधिनियमच्या तरतुदीप्रमाणे देता येत नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाचे खंडपीठातील जन माहिती अधिकारी यांना तसे कळविले असले तरी तक्रारी व अपीले, माहितीचे अर्ज हे दाखलच करीत असतात. व त्यामुळे जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे निकाली काढण्यात येते.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.859-860

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1145 नाग/2010

श्री तुळशीराम रुषी सहारे
गोकुलनगर वार्ड क्र.12, चामोर्शी रोड गडचिरोली
ता. जि. गडचिरोली ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा समाज कल्याण अधिकारी
जिल्हा परिषद गडचिरोली
ता. जि. गडचिरोली
2) जन माहिती अधिकारी तथा
(समाज कल्याण विभाग) जिल्हा परिषद गडचिरोली
ता. जि. गडचिरोली ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 30.8.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 26.7.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 2.8.2010 रोजी नोटीस काढून दि. 30.8.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 17.3.2010 रोजी जन माहिती अधिकारी जिल्हा समाज कल्याण अधिकारी जिल्हा परिषद गडचिरोली यांचेकडे मतिमंद विद्यालयाच्या संदर्भात माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. सोबत बी.पी.एल. प्रमाणपत्र दाखल केलेले आहे. परंतू अपीलकर्ता हे दारिद्रय रेषेखालील आहे असे आढळुन येत नाही. तसेच त्यांचे मासिक उत्पन्न 1000/— रु. दिलेले आहे. परंतू ते माहितीच्या अधिकारात माहिती मागतांना अनेक अर्ज करतात व अपीलाच्या सुनावणीस ते गडचिरोली वरुन नागपूर येथे प्रत्येक वेळेस हजर राहू शकतात. त्यामुळे त्यांचे दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र संशयास्पद आहे असे वाटते. व त्याबद्यलची संबंधित पंचायत समिती गडचिरोली यांचे खंड विकास अधिकारी यांनी चौकशी करुन आयोगाकडे अपील क्रमांक 1145/2010 प्रकरणी अहवाल पाठवावा. अहवाल प्राप्त झाल्यावर अपीलकर्ता हे दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र धारक आहे हे सिध्द झाल्यास त्यांच्या अपीलाचा पुढे विचार करता येईल.

**आ दे श**

1) खंड विकास अधिकारी पंचायत समिती गडचिरोली यांनी अपीलकर्ता यांच्या दारिद्रय रेषेखालील अर्हतेच्या संदर्भामध्ये चौकशी करावी व ते दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र धारण करण्यास पात्र आहे किंवा नाही याबद्यलचा अहवाल आयोगाकडे अपील क्रमांकचा संदर्भ देवून पाठविण्यात यावा. व दारिद्रय रेषेखालील निकषात बसत नसल्यास तसे गडचिरोली तहसिलदार यांना कळवावे.

2) सदरच्या निर्णयाची एक प्रत **खंड विकास अधिकारी पंचायत समिती गडचिरोली** यांना पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावी.

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.862-863

जा.क्र.—————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1144 नाग/2010**

श्री किशोर मारोतराव खडगी
कवडू पाठलाच्या आखाडजवळ,
गंगाबाई घाट रोड, जुनी मंगळवारी नागपूर
ता. जि. नागपूर 440008 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्र. कुलगुरु
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर
ता. जि. नागपूर
2) जन माहिती अधिकारी तथा कुलसचिव
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 30.8.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 27.4.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 2.8.2010 रोजी नोटीस काढून दि. 30.8.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 29.12.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांचेकडे रोस्टर निर्धारण करण्यासाठी विद्यापीठाने निचित केलेले मापदंड व कार्यपध्दतीची माहिती अशी माहिती मागितलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दि. 15.2.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 22.4.2010 रोजी देण्यात आला असून माहिती उपलब्ध करुन दिली या कारणास्तव अपील खारीज करण्यात आलेले आहे. व त्यानंतर मात्र दि. 27.4.2010 रोजी द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता गैरहजर आहे. परंतू अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील मेमोमध्ये उपलब्ध असलेली माहिती ही अपूर्ण व विसंगत आहे असे नमूद केलेले आहे. परंतू अपीलकर्ता यांना माहिती प्राप्त झाल्यानंतरच प्रथम अपीलाची सुनावणी झालेली आहे व त्या सुनावणीच्या वेळेस अपीलकर्ता यांना उपस्थित राहून माहिती कशी विसंगत आहे याबद्यल प्रथम अपीलीय अधिकारी यांचे निदर्शनास आणल्यामुळे अधिनियमाच्या तरतुदीचे स्पष्टपणे उल्लंघन झालेले आहे असा निष्कर्ष काढलेला आहे. सदरच्या अपीलाच्या संदर्भामध्ये माहिती विलंबाने दिली व अपुर्ण दिली हा निष्कर्ष दिसून येतो. त्याबाबत जन

माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी आयोगापुढे असे सांगितले की सदरची माहिती ही जन माहिती अधिकारी यांना शाखांकडून उपलब्ध करुन घेवून द्यावयाची असते. असे असले तरी मुळात अर्ज हा सुमारे 1 महिन्याच्या कालावधीनंतरच संबंधित शाखांकडे पाठविण्यात आलेला आहे म्हणजे माहितीचा अर्ज हाच मुळात विलंबाने हस्तांतर झालेला आहे. व त्यामुळे जन माहिती अधिकारी हे दोषी आढळुन येतात. परंतू ते सेवानिवृत्त झाले व त्यांच्या सेवानिवृत्तीच्या शेवटच्या कालावधीतील हे अर्ज असल्यामुळे विलंब झालेला आहे असे आयोगापुढे स्पष्टिकरण देण्यात आले. अपूर्ण माहितीच्या संदर्भात जशी माहिती जन माहिती अधिकारी यांना शाखांकडून उपलब्ध झाली तशीच माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. परंतू प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दोन तीन ओळीचे निर्णय सादर करुन कोणत्याही प्रकारे माहिती उपलब्ध करुन न देता माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश देणे म्हणजे त्यांची जबाबदारी टाळणे असा निष्कर्ष निघतो. असे असले तरी आज आयोगापुढे अपीलकर्ता हजर नाही व जन माहिती अधिकारी यांनी त्यांना रोस्टर पध्दत समजावून देण्यात आलेली आहे असे आयोगास सांगितल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे निकाली काढण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.864-865

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1152 नाग/2010 व अपील क्रमांक 1205 नाग/2010**

**<u>अपील क्रमांक 1152 नाग/2010</u>**

जन माहिती अधिकारी
श्री अग्रसेन महाराज नागरी सह.पत संस्था मर्या.गोंदिया
गौरक्षण मार्केट गोंदिया 441601 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक निबंधक
सहाकारी संस्था गोंदिया
आंबेडकर चौक, ता. जि. गोंदिया
2) श्री चांदमल गंगाधार अग्रवाल (मूळ अर्जदार)
गंजवार्ड, जयश्री टॉकीजच्या बाजूला, गोंदिया
ता. जि. गोंदिया ..... **उत्तरवादी**

**<u>अपील क्रमांक 1205 नाग/2010</u>**

श्री चांदमल गंगाधार अग्रवाल (मूळ अर्जदार)
गंजवार्ड, जयश्री टॉकीजच्या बाजूला, गोंदिया
ता. जि. गोंदिया

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक निबंधक
सहाकारी संस्था गोंदिया
आंबेडकर चौक, ता. जि. गोंदिया
2) जन माहिती अधिकारी
श्री अग्रसेन महाराज नागरी सह.पत संस्था मर्या.गोंदिया
गौरक्षण मार्केट गोंदिया 441601

**( आदेश पारित दिनांक 31.8.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी अनुक्रमे दिनांक 30.7.2010 व दिनांक 10.8.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 6.8.2010 व दि. 16.8.2010 रोजी नोटीस काढून दि. 31.8.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात

आले होते. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज घेण्यात आली. अपील क्रमांक 1152 नाग/2010 मध्ये अपीलकर्ता गैरहजर आहे व उत्तरवादी हजर आहेत. अपील क्रमांक 1205 नाग/2010 मध्ये अपीलकर्ता व प्रथम अपीलीय अधिकारी हजर आहेत. जन माहिती अधिकारी हे गैरहजर आहेत.

2. अपील क्रमांक 1152 नाग/2010 मध्ये श्री अग्रसेन महाराज नागरी सह.पत संस्था मर्या.गोंदिया यांनी प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था गोंदिया यांचे विरुध्द द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपील क्रमांक 1205 नाग/2010 मध्ये प्रथम अपीलीय अधिकारी यांनी श्री अग्रसेन महाराज नागरी सह.पत संस्था मर्या.गोंदिया या संस्थेस माहिती उपलब्ध करुन द्यावी अशा प्रकारचा निर्णय दि. 2.7.2010 रोजी श्री चांदमल गंगाधार अग्रवाल यांच्या अर्जाच्या अनुषंगाने दिलेला होता. परंतू निर्णयाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून श्री चांदमल गंगाधार अग्रवाल यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. व प्रथम अपीलाच्या निर्णया विरुध्द वर नमुद केल्याप्रमाणे श्री अग्रसेन महाराज नागरी सह.पत संस्था मर्या. यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करुन माहितीचा अधिकार अधिनियम 2005 सहकारी संस्थेस लागू होत नाही असे कारण दिलेले आहे.

3. अपीलकर्ता हे हजर आहेत व त्यांनी प्रथम अपीलाच्या निर्णया प्रमाणे माहिती मिळावी असे आयोगापुढे सांगितले. प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत. त्यांचे प्रतिनिधी यांनी प्रधान सचिव (सहकार व पणन) सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था मर्या. पुणे यांना दि. 16.1.2010 रोजी दिलेले पत्र आयोगाचे निदर्शनास आणले. सदरच्या पत्राच्या अनुषंगाने सहकार अधिकारी श्रेणी 2 यांनी आयोगापुढे असे सांगितले की सदरच्या पत्राप्रमाणे सहकारी संस्थानी माहिती द्यावी असे मत दिलेले असल्यामुळे सदरचा निर्णय दिलेला आहे. परंतू त्याच निर्णया विरुध्द सहकारी संस्थांना माहितीचा अधिकार लागू होत नाही अशा प्रकारचे कारण देवून द्वितीय अपील दाखल केलेले आहे. परंतू त्याबाबतचा तपशिल त्यांनी दिलेला नाही. व आज त्याबाबत खुलासा करण्यासाठी ते हजर सुध्दा राहिलेले नाहीत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे सुध्दा त्यांनी कोणत्याही प्रकारे खुलासा केलेला नाही.

4. प्रधान सचिव (सहकार व पणन) यांच्या पत्राचे अवलोकन केले असता असे दिसून येते की ज्या सहकारी संस्थांना माहितीचा अधिकार लागू आहे अशा सहकारी संस्थांबाबत नागरीकांना माहिती देणे बंधनकारक आहे असे नमूद केलेले आहे. परंतू माहितीचा अधिकार अधिनियम 2005 हा अधिनियम अंमलात येवून 5 वर्षे पूर्ण होत आहे. सहकारी संस्थांच्या संदर्भामध्ये मा. उच्च न्यायालय मुंबई व खंडपीठ नागपूर व खंडपीठ औरंगाबाद यांचे निर्णय उपलब्ध झालेले आहेत. तसेच देशातील इतर मा. उच्च न्यायालयाचे निर्णय सुध्दा सहकारी संस्थांच्या बाबतीत उपलब्ध झालेले आहेत. व त्यामध्ये ज्या सहकारी संस्थांना शासनाकडून कोणत्याही प्रकारचा अनुदान किंवा निधी उपलब्ध होत नाही अशा सहकारी संस्थांना माहितीचा अधिकार लागू होत नाही असा निर्णय मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ नागपूर यांच्याकडे याचिका क्र. 5666/2008 मध्ये निर्णय दिलेला आहे. त्यामुळे मा. उच्च न्यायालयाचा संदर्भ घेवून निश्चित असे पत्र

किंवा मत हे केले असते तर सहकार खात्यास मार्गदर्शन उपलब्ध झाले असते. परंतू संदिग्ध असे पत्र दिले असल्यामुळे त्यातून काहीही निष्पन्न होत नाही. व उलट सहकार खात्यातील अधिका–यांचा गैरसमज वाढून या प्रकरणात प्रथम अपीलीय अधिकारी यांनी निर्णय दिला त्याप्रमाणे निर्णय दिल्या जातात. परीणामी नागरीकांच्या पुढे स्पष्टपणे कोणतेही परिमाण राहात नाही उलट नागरीकांचा गैरसमज वाढत जातो. कमीत कमी सहकार खात्यानी तरी निश्चित मार्गदर्शन होईल अशा प्रकारे परिपत्रक काढावे. कनिष्ठ अधिकारी कोणत्याही प्रकारे विचार न करता शासन स्तरावरील पत्र असल्यामुळे त्याची आंधळेपणानी अंमलबजावणी करतात.

5. श्री अग्रसेन महाराज नागरी सह.पत संस्था मर्या.यांना शासनाकडून कोणत्याही प्रकारचा निधी किंवा अनुदान उपलब्ध होत नसल्यामुळे मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ नागपूर यांच्या निर्णयाप्रमाणे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदी लागू होणार नाही व त्यामुळे अपील क्रमांक 1205 नाग/2010 मधील प्रथम अपीलाचा निर्णय रद्द करण्यात येवून अपील खारीज करण्यास पात्र आहे तसेच अपील क्रमांक 1152 नाग/2010 हे मंजूर करण्यात येत असून प्रथम अपीलीय अधिकारी यांचा निर्णय रद्द करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपील क्रमांक 1152 नाग/2010 हे मंजूर करण्यात येत असून प्रथम अपीलीय अधिकारी यांचा निर्णय रद्द करण्यात येतो.
2) अपील क्रमांक 1205 नाग/2010 यातील प्रथम अपीलचा निर्णय रद्द केलेला असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.
3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.866-868

जा.क्र.———————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1157 नाग/2010 व अपील कमांक 1158 नाग/2010**

श्री साबाजीराव गोपाळराव दळवी
1 महाराष्ट्र बॅक रोड, अमोल फार्मसी जवळ,
अयोध्या नगर, नागपूर
ता. जि. नागपूर 440024 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री गिरी गोसावी
प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक
भूमी अभिलेख कार्यालय नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्री हमजादे
जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक
भूमी अभिलेख कार्यालय उमरेड
ता. उमरेड जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 31.8.2010 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी अनुक्रमे दि. 29.7.2010 व दि. 3.8.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 6.8.2010 व दि. 13.8.2010 रोजी नोटीस काढून दि. 31.8.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपील क्र. 1157 नाग/2010 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 13.8.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख कार्यालय उमरेड यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

1. मा. अतिरिक्त जिल्हाधिकारी नागपूर यांचे दि. 4.11.2008 चे आदेशा नुसार (रेव्हे. अपील) ख.क्र.473 मौ. मकरधोकडा मध्ये चुकीने नोंदलेला वाघोली–मकरधोकडा–शिरपूर रस्त्याची नोंद आवेदकाचे दि. 21.11.2008 चे अर्ज व सलग्न उपरोक्त आदेश प्रमाणे भूमी अभिलेख तथा गाव नकाशा रद्य करण्याची दुरुस्ती केली काय? केली असल्यास त्या नकाशा व अहवालाची प्रती देण्यात यावी.

2. ख.क्र.472/1 मौ. मकरधोकडा ता. उमरेड आराजी 1.15 हे. या जमिनीचे फेर सिमांकन मा. अतिरिक्त जिल्हाधिकारी नागपूर यांचे रेव्हे.अपील मध्ये पारीत दि.12.6.09

च्या आदेशानुसार करुन सदर नकाशा दुरुस्तीसह 2 प्रती देण्यात याव्या. आदेशप्रत व दुरुस्तीकरीता आवेदकाचा अर्ज आपणाकडे दि. 16.7.09 ला दिला आहे.

3. भू.मा.क्र.472/1, 472/2 मौ. मकरधोकडा ता. उमरेड या शेताची मोजणी तुम्ही श्री मोरबा राघो भोयर याचे अर्जानुसार मोजणी मामला क्र. 61/ब/2004–2005 अन्वये दि. 22.6.2005 ला केली होती. त्या मोजणी बद्यल श्री मोरबा राघो भोयर यांनी दाखल केलेल्या अर्जाची प्रत देण्यात यावी.

4. सदर दि. 22.6.2005 ची मोजणी करण्याकरीता नियुक्त तथा प्रत्यक्ष मोजणी करणा–या भू.मा.पथकाची नावे, त्यांचा हल्लीचा कार्यालयाचा पत्ता द्यावा.

5. आपले कार्यालयीन भूमापक श्री विनोद जगन्नाथ यंगलवार यांना दि. 22.6.2005 च्या उपरोक्त निर्देशित शेताच्या मोजणी करिता नियुक्त केले होते काय त्याचा त्या वेळचा कार्यालयीन हुद्या व पत्ता तसेच नियुक्ती ज्ञापनाची प्रत देण्यात यावी.

6. भू.मा.क्र.472/1, 472/2 मौ. मकरधोकडा ता. उमरेड या शेताची मोजणी तुम्ही श्री मोरबा राघो भोयर याचे अर्जावर मोजणी मामला क्र. 61/ब/2004–2005 अन्वये दि. 22.6.2005 ला तुमचे कार्यालयाने केली होती. ती मोजणी दि. 12.12.05 च्या ज्ञापनान्वये रद्य केली ती नंतर दि. 12.12.05 ला त्याच ज्ञापनात मोजणी न करता सुधारीत क प्रत देण्यात आली होती. ही सुधारीत नकाशा करण्याची कार्यवाही ज्या प्रत्यक्ष मोजणी द्वारे करण्यात आली ती तारीख व त्या मोजणीचा नकाशा प्रत देण्यात यावी. दुरुस्ती मोजणी झाली नसल्यास तसा अहवाल देण्यात यावा. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 8.9.2009 रोजी मागितलेल्या माहितीपैकी कार्यालयात उपलब्ध असलेल्या माहितीचे आपल्या प्रश्नाच्या अनुषंगाने अवलोकन करावे व आपणास आवश्यक असलेली माहिती विहित फी भरुन घेवून जावे असे कळविलेले दिसून येते. व त्यानंतर दि.18.11.2009 व 20.11.2009 रोजी अपीलकर्ता यांना काही माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतू अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 26.2.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 29.3.2010 रोजी देण्यात आला असून रु. 62/– चा भरणा करुन माहिती प्राप्त करुन घेतलेली असल्यामुळे प्रथम अपील क्रमांक 107 हे मुदती नंतर म्हणजे 210 दिवसानी दाखल केलेले असल्यामुळे अमान्य केलेले आहे. परंतू अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी माहिती न मिळाल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. द्वितीय अपील मेमोमध्ये त्यांना अद्यापपर्यंत संपूर्ण माहिती मिळालेली नाही या संदर्भात त्यांनी तपशिलात मुद्ये दिलेले आहेत. अपीलकर्ता हे नंतर उपस्थित झाले व त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्ता यांना अपूर्ण माहिती मिळालेली आहे. मुळातच अपीलकर्ता यांचे प्रथम अपील हे विलंबाने सादर झालेले होते व त्यांना रु. 62/– भरुन माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे ते खारीज करण्यात आले असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सांगितले. द्वितीय अपील मेमोमध्ये सुध्दा अपीलकर्ता यांनी माहिती मागतांना दुरुस्त करुन माहिती उपलब्ध करुन द्यावी म्हणजे कार्यवाही करुन माहिती उपलब्ध करुन द्यावी अशी मागणी केलेली आहे. परंतू माहितीचा अधिकार

अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे अर्जदाराच्या अर्जाच्या तारखेस ज्या स्वरुपात माहिती उपलब्ध असते त्याच स्वरुपात ती उपलब्ध होते. जशी कागदपत्रे आहेत तशीच कागदपत्रे उपलब्ध होतात. कोणतीही कार्यवाही करुन माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षित नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांना जर त्या तारखेस उपलब्ध असलेली कागदपत्रे उपलब्ध झालेली नसतील तर त्या संदर्भात प्रथम अपीलाची सुनावणी घेवून अपीलकर्ता यांचेकडून कागदपत्राच्या स्वरुपात कोणती माहिती उपलब्ध झाली नाही ही माहिती घेवून त्यांना त्या वेळेस जशी कागदपत्रे आहेत तशीच कागदपत्रे उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे प्रथम अपीलाची सुनावणी पुन्हा घेणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

4. अपील क्र. 1158 नाग/2010 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 7.1.2010 रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख कार्यालय उमरेड यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

लोकशाही दिन प्रकरण 731/05 मौ. मकरधोकडा ता. उमरेड भू.मा.क्र.472, 473 ची आपले कार्यालयीन झालेल्या मोजणी बाबत (दि. 22.12.09 ची) माहिती देण्याबाबत.

1. मौ. मकरधोकडा ता. उमरेड भू.मा.क्र.472, 473 च्या दि. 22.12.09 आपल्या कार्यालयाद्वारे केलेल्या मोजणीचा प्रमाणित नकाशा.

2. सदर दि. 22.12.09 च्या मोजणी बाबत मा. भूमापक यांनी सादर केलेल्या अहवालाची प्रमाणीत प्रत. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 22.2.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 29.3.2010 रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांना दि. 2.2.2010 रोजी तालुका निरीक्षक भूमी अभिलेख उमरेड कार्यालयाने फी चा भरणा करुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे कळविले. त्यावर दि. 16.2.2010 रोजी रेकॉर्ड पाहण्याकरीता भेट दिली असता रेकॉर्ड दाखविण्यात आले नाही असे त्यांनी आक्षेप घेणारे पत्र दिलेले दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन झालेली नसल्यामुळे त्यांनी प्रथम अपील दाखल केले. व प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये माहिती मिळालेली नाही असा निष्कर्ष काढूनच त्यांचे अपील क्रमांक 106 हे मंजूर केलेले आहे. व यावरुनच अपीलकर्ता यांना त्यानंतर जी माहिती उपलब्ध झाली ती माहिती ही विलंबाने उपलब्ध झाली असे त्यांचे म्हणणे आहे.

5. जन माहिती अधिकारी यांनी वरील दोन्ही अर्जाच्या संदर्भात जे उत्तर पाठविलेले आहे ते अतिशय संदिग्ध व अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीचे पालन न करणारे आहे. अपीलकर्ता यांनी जर मुद्येनिहाय कागदपत्रे मागितली असती तर त्या कागदपत्राच्या उपलब्धतेच्या संदर्भामध्ये मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षित असते. परंतू तालुका निरीक्षक भूमी अभिलेख यांची कार्यपध्दती ही माहिती उपलब्ध करुन न देण्याकडे दिसून येते. आयोगाकडे मात्र त्यांनी खुलासा करतांना मुद्येनिहाय खुलासा केलेला आहे. ज्यांनी माहिती मागितली त्यांना माहिती द्यावयाची नाही व ज्यांनी माहिती मागितलेली नाही परंतू आयोगाकडे मात्र मुद्येनिहाय खुलासा करावयाचा. याबाबत

तालुका निरीक्षक भूमी अभिलेख यांना अधिनियमाच्या तरतुदीचे ज्ञान नाही असा निष्कर्ष काढावा लागतो किंवा माहिती उपलब्ध करुन देण्याची टाळाटाळ केली जाते अशी प्रवृत्ती दिसून येते. व त्यामुळे जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख हे दोषी आढळुन येतात व त्यांचेविरुध्द शास्ती लादणे आवश्यक आहे. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपील क्र. 1157 नाग/2010 मध्ये प्रथम अपीलीय अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यासाठी अपीलकर्ता यांना नोटिस काढावी व प्रथम अपीलाचा निर्णय हा करणा सहीत द्यावा. व त्याच दिवशी मागितलेली माहिती विनामुल्य कागदपत्राच्या स्वरुपात उपलब्ध करुन द्यावी.
2) अपील क्र. 1158 नाग/2010 हे अंशतः मंजुर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख यांनी माहिती विहित मुदतीत दिली नाही म्हणून दोषी आढळून येत असल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे रु. 500/– ची शास्ती लावण्यात येते. सदरच्या शास्तीची वसुली ही त्यांचे दरमहाचे वेतनातून वसुल करावयाची असून लेखाशिर्ष ''0070–इतर प्रशासनिक सेवा, 60, इतर सेवा, 800, इतर जमा रकमा, (18) माहितीचा अधिकार (0070–016'1)'' मध्ये जमा करण्यात यावी.
3) सदरच्या निर्णयाची एक प्रत **उपसंचालक भूमी अभिलेख नागपूर या**चेकडे पुढील कार्यवाहीसाठी स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.
4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.870-873

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**